CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. २९ जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २९२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अजित पवार यांचे विमान अपघातात निधन



**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. २८ जानेवारी :** उपमुख्यमंत्री यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणासाठी आजचा दिवस अत्यंत शोकजनक ठरला आहे. जिल्हा परिषद निवडणुकांच्या प्रचार सभांच्या निमित्ताने अजित पवार मुंबईहून बारामती दौऱ्यावर निघाले होते. मात्र बारामतीत लँडिंग करताना विमान कोसळून आग भडकली. यामध्ये अजित पवार यांच्यासह विमानातील सहा जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये अजित पवार यांच्यासह अजित पवार, त्यांचे सुरक्षारक्षक, वैमानिक यांचा समावेश आहे. अजित पवार यांच्या निधनाने पवार कुटुंबासह राष्ट्रवादीचे समर्थकांवर शोककळा पसरली आहे.

अजित पवार यांचे विमान सकाळी सव्व-नऊ वाजताच्या सुमारास बारामतीत लँड होणार होते. त्यावेळी विमान कोसळले आणि त्याने पेट घेतला. या अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विमानातील सर्व सहा प्रवाशांचा मृत्यू झाला. ज्या बारामतीत अजित पवार यांचं राजकारण रुजलं, तिथेच त्यांनी अखेरचा श्र्वास घेतला. अपघातापूर्वी अजित पवार यांनी 'एक्स' सोशल मीडियावर केलेलं ट्वीट शेवटचं ठरलं आहे.

अजित पवार यांचं शेवटचं ट्वीट

सकाळी ८ वाजून ५७ मिनिटांनी अजित पवार यांनी ट्वीट केलं होतं. महान स्वातंत्र्य सेनानी, पंजाब केसरी लाला लजपत राय यांना जयंतीदिनी अभिवादन करणारं ट्वीट त्यांनी केलं. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे, महान स्वातंत्र्य सेनानी, स्वराज्याचे उद्घोषक, 'पंजाब केसरी' लाला लाजपत राय जी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! त्यांची राष्ट्रनिष्ठा आपल्याला कायमच प्रेरणा देत राहील असं ट्वीट त्यांनी

## आज सकाळी होणार अंत्यसंस्कार; राज्यात तीन दिवसांचा दुखवटा

**तभा वृत्तसेवा**

**बारामती, दि. २८ जानेवारी :** राष्ट्रवादी काँग्रेस नेते आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे (दि.२८ जानेवारी) सकाळी विमान अपघातात निधन झाले. मुंबईवरून बारामती इथं येत असताना बारामती विमानतळावार लँडिंगच्यावेळीच विमानाला भीषण अपघात झाला. त्यात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला आहे.

शारदा प्रांगण येथे अंत्यदर्शन

दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरूवारी (दि.२९ जानेवारी) सकाळी ११ वाजता पार पडणार आहे. अंत्यविधी बारामती तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील विद्या प्रतिष्ठान येथे करण्याचे नियोजन असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. यापूर्वी (दि.२८ जानेवारी) अंत्यदर्शनाचा कार्यक्रम बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीतील शारदा प्रांगण येथे ठेवण्यात येणार आहे.ही दु:खद घटना समजताच सकाळपासून राज्यासह देशभरातून मोठ्या संख्येने नागरिक, कार्यकर्ते आणि नेतेमंडळी अंत्यदर्शनासाठी उपस्थित राहण्यास सुरूवात झाली आहे.

**राज्यभर तीन दिवसांचा दुखवटा घोषित**

दरम्यान, अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्रभर शोककळा पसरली असून (दि. २८ जानेवारी) राज्यात शासकीय सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसेच अधिकृतरीत्या राज्यभर तीन दिवसांचा दुखवटा घोषित करण्यात आला आहे. पुणे महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार (दि.२८ जानेवारी) आणि आज (दि.२९ जानेवारी) पुणे शहर बंद ठेवण्यात येणार असून, उद्या मार्केटयार्डही बंद राहणार आहे. प्रशासनाकडून शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.



बारामती येथे झालेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. अजित



पवार यांचे अकाली निधन ही एक अपरिमित हानी आहे. महाराष्ट्राच्या विकासात, विशेषतः सहकार क्षेत्रातील त्यांच्या विशेष योगदानासाठी ते सदैव स्मरणात राहतील. मी त्यांचे कुटुंब, समर्थक आणि चाहत्यांप्रती शोकसंवेदना व्यक्त करते. ईश्र्वर या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या इतर सर्व व्यक्तींच्या कुटुंबांनाही हा आघात सहन करण्याची शक्ती देवो.

**–द्रौपदी मुर्मु, राष्ट्रपती**



अजित पवार हे जनतेशी घट्ट नाते असलेले, तळा-गाळाशी मजबूत नाळ असलेले लोकनेते होते. महाराष्ट्रातील जनतेच्या सेवेत सदैव अग्रभागी राहणारे एक मेहनती व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना व्यापक आदर होता. प्रशासकीय बाबींची त्यांना सखोल जाण होती. गरीब आणि वंचितांच्या सक्षमीकरणासाठीची त्यांची तळमळ विशेष उल्लेखनीय होती. त्यांचे अकाली निधन अत्यंत धक्कादायक व दुःखद आहे. त्यांच्या कुटुंबीयांप्रती आणि असंख्य चाहत्यांप्रती मनःपूर्वक शोकसंवेदना. शांती.

**–पंतप्रधान नरेंद्र मोदी**

आज एका अत्यंत दुःखद अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि आमचे एनडीएचे ज्येष्ठ



सहकारी अजित पवार यांना गमावल्याची बातमी ऐकून मन अत्यंत व्यथित झाले आहे. अजित पवार यांनी गेली साडेतीन दशके ज्या प्रकारे महाराष्ट्रातील प्रत्येक वर्गाच्या कल्याणासाठी स्वतःला समर्पित केले, ते शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. जेव्हा जेव्हा त्यांची भेट व्हायची, तेव्हा ते महाराष्ट्राच्या जनतेच्या हिताच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करायचे. त्यांचे निधन ही एनडीए कुटुंबासह माझी देखील वैयक्तिक हानी आहे. मी पवार परिवाराप्रती माझ्या संवेदना व्यक्त करतो. दुःखाच्या या प्रसंगी संपूर्ण एनडीए शोकाकुल पवार परिवारासोबत खंबीरपणे उभा आहे. ईवर दिवंगत आत्म्यास आपल्या चरणी स्थान देवो. शांती शांती शांती

**– केंद्रीय गृहमंत्री अमित शहा**



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आज विमान अपघातात निधन झाल्याचे वृत्त अत्यंत वेदनादायक आहे. या कठीण प्रसंगी मी महाराष्ट्राच्या जनतेच्या दुःखात सहभागी आहे. संपूर्ण पवार कुटुंब आणि त्यांच्या प्रियजनांप्रती मी या शोकप्रसंगी आपल्या संवेदना व्यक्त करतो.

**– विरोधी पक्षनेता राहुल गांधी**

अजित पवार महाराष्ट्रातले लोकनेते होते आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेला,



महाराष्ट्राच्या प्रश्र्नांची जाण असलेला अशा प्रकारचा हा नेता होता. अजित पवार यांच्याबद्दल जनसामान्यांमध्ये मोठी आस्था होती. अजित पवार हे संघर्ष करणारे नेते होते. कुठल्याही परिस्थितीत न डगमगता पुढे जाणारं व्यक्तिमत्व होतं. आजचा दिवस महाराष्ट्रासाठी कठीण दिवस आहे. अशा प्रकारचं नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्षे लागतात. महाराष्ट्राच्या विकासात महत्त्वाचं योगदान ते देत होते, त्याचवेळी त्यांचं निधन झालं ही बाब अविश्वसनीय आहे. माझ्यासाठी वैयक्तिक नुकसान झालं आहे. दमदार आणि दिलदार मित्र निघून गेला आहे. पवार कुटुंबावरही हा मोठा आघात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांनाही मी घडलेल्या परिस्थितीची कल्पना दिली आहे. या घटनेबाबत त्यांनीही प्रचंड दुःख व्यक्त केलं आहे. संपूर्ण घटनेमुळे राज्यात हळहळ पसरली आहे. कुटुंबाकडून पुढील गोष्टी ठरवण्यात येणार आहेत. सुप्रिया सुळे आणि पार्थ पवार यांच्याशी माझं बोलणं झालं आहे. महाराष्ट्रात आज शासकीय सुटी घोषित केली आहे. तसंच तीन दिवसांचा दुखवटाही जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्रातून असे लोकनेते गेल्यावर जी पोकळी निर्माण होते ती भरुन काढणं कठीण असतं. इतक्या जवळून, इतक्या संघर्षाच्या काळात आम्ही एकत्र काम केलं आहे. अजित पवार नाहीत या गोष्टीवर विश्वास ठेवायलाच मन तयार होत नाही अशी स्थिती आहे.

**– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

**तभा वृत्तसेवा**

**बारामती, दि २८ जानेवारी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला बारामतीमध्ये भीषण अपघात झाला आहे. ताज्या अपडेट्सनुसार या विमान अपघातात अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

बारामतीमध्ये विमान लँड होताना झालेल्या अपघातानंतर विमानाला आग लागली आणि विमान जळून खाक झालं आहे. ते आज मुंबईहून बारामतीकडे सभांसाठी आलेले होते. या घटनेनं महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. धडाडीचे नेते म्हणून अजित पवारांची देशभरात ओळख होती.

अजित पवारांना मुंबईवरून बारामतीला घेऊन जाणाऱ्या विमानाचा अपघात झाला त्यानंतर हे जळून खाक झालं आहे. बारामती दौऱ्यासाठी ते आले होते. विमानतळाजवळच विमान लँड होताच हे विमान कोसळलं. २ पायलट १ अटेंडस अजित पवार आणि अजित पवारांसोबत असेलला व्यक्ती यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताने राज्याला मोठा धक्का बसला आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी अजितदादा प्रचारासाठी बारामतीला जात होते. या निवडणुकीमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस या निवडणुकीसाठी

एकत्र आल्या होत्या. महानगर पालिका निवडणुकीचा निकाल पाहता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी त्यांनी प्रचाराला वेग घेतला होता. हा अपघात नेमका कशामुळे झाला. तांत्रिक बाब काय, या सर्व प्रकरणाची चौकशी विमानतळ प्रशासनाने सुरू केली आहे.

अजितदादा म्हटलं समोर येतं ते धारदार आवाज आणि रांगडं व्यक्तिमत्व अजितदादा म्हटलं की समोर येतं ते धारदार आवाज आणि स्पष्टवक्तपणा असलेलं रांगडं व्यक्तिमत्व. समोरच्याचं काम होत असेल तर करणारच आणि होत नसेल तर त्याला नाही म्हणून तोंडावर सांगणारा नेता म्हणजे अजित पवार, आज विमानातील अपघातात अजित पवारांचं आज दुर्दैवी निधन झालं आहे.

## अजितदादांची राजकीय कारकीर्द

अजित अनंतराव पवार यांची राजकीय कारकीर्द

नाव : अजित अनंतराव पवार

जन्मतारीखः २२ जुलै १९५९

जन्मस्थानः देवळाली प्रवरा, राहुरी तालुका, अहमदनगर

शिक्षणः बी. कॉम

ज्ञात भाषाः मराठी, हिंदी, इंग्रजी

व्यवसायः शेती

पत्नीचे नावः पत्नी सौ. सुनेत्रा अजित पवार

मुले पार्थ आणि जय

पदे- बारामती विद्या प्रतिष्ठानचे विश्र्वस्त.

सदस्य वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट संस्था, पुणे रयत शिक्षण संस्था, सातारा संचालक

महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष ऑगस्ट

२००६ ते १९ ऑगस्ट २०१८.

पासून पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सप्टेंबर २००६

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन मार्च २०१३ पासून

सेवादास संचालक : महानंद आणि महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई

सप्टेंबर २००५ ते महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मार्च २०१३ आणि २५ नोव्हेंबर २०१८ पासून अध्यक्ष म्हणून काम करत आहे

पूर्वीच्या विधानसभा / विधानपरिषद / लोकसभा /

राज्यसभेचे सदस्य आणि संसद सदस्य / समिती प्रमुख म्हणून केलेले काम (कार्यकाळात)

लोकसभा सदस्य : जून १९९१ ते सप्टेंबर १९९१

विधानसभा सदस्य : १९९१ ते १९९५, १९९५ ते १९९९,

१९९९ ते २००४, २००४ ते २००९, २००९ ते सप्टेंबर २०१४, २०१४ ते २६ सप्टेंबर २०१९. २०१९ ते २०२४

राज्य/केंद्रीय मंत्री/राज्यमंत्री म्हणून केलेले काम

कृषी आणि ऊर्जा राज्यमंत्रीः जून १९९१ ते नोव्हेंबर १९९२

पाणीपुरवठा, ऊर्जा आणि नियोजन राज्यमंत्रीः नोव्हेंबर १९९२ ते फेब्रुवारी १९९३

पाटबंधारे मंत्री (कृष्णा खोरे आणि कोकण पाटबंधारे),

फलोत्पादन : ऑक्टोबर १९९९ ते जुलै २००४

ग्रामीण विकास, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, पाटबंधारे मंत्री (कृष्णा खोरे आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ): जुलै २००४ ते नोव्हेंबर २००४

जलसंपदा मंत्री (कृष्णा खोरे पाटबंधारे वगळ-ून), जलसंपदा आणि स्वच्छता : नोव्हेंबर २००४ ते नोव्हेंबर २००९.

जलसंपदा मंत्री (कृष्णा खोरे आणि कोकण पाटबंधारे वगळून), ऊर्जा : नोव्हेंबर २००९ ते नोव्हेंबर २०१०

उपमुख्यमंत्री (वित्त, नियोजन आणि ऊर्जा) नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१२

उपमुख्यमंत्री (वित्त, नियोजन आणि ऊर्जा): डिसेंबर २०१२ ते सप्टेंबर २०१४

उपमुख्यमंत्री : २३ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर २०१९

उपमुख्यमंत्री : ३० डिसेंबर २०१९ ते २९ जून २०२२

विरोधी पक्षनेते : ४ जुलै २०२२ ते ३० जून २०२३

उपमुख्यमंत्री : २ जुलै २०२३ ते २६ नोव्हेंबर २०२४

आता महायुती सरकारच्या काळात देखील ते उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून कार्यरत होते.

## विशेष संपादकीय

### महाराष्ट्राचा 'दादा' हरपला...



अजित पवार यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील देवळाली प्रवरा येथे झाला होता. ते शरद पवार यांचे मोठे भाऊ अनंतराव पवार यांचे सुपुत्र होत. अजित यांचे वडील चित्रपटसृष्टीशी संबंधित होते आणि मुंबईतील व्ही. शांताराम यांच्या राजकमल स्टुडिओमध्ये काम करत होते. पवारांचे आजोबा, गोविंदराव पवार, बारामती सहकारी व्यापारात काम करत होते आणि त्यांच्या आजी शेतीची देखभाल करत होत्या. अजित यांच्या मोठ्या भावाचे नाव श्रीनिवास आहे. श्रीनिवास कृषी आणि ऑटोमोबाइलशी संबंधित मोठे व्यावसायिक आहेत. असे म्हटले जाते की अजित आपल्या महत्त्वाच्या निर्णयांमध्ये मोठ्या भावाचा सल्ला घेत असत. त्यांनी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी हायस्कूल, बारामती येथून आपले प्राथमिक शिक्षण घेतले. कॉलेजमध्ये असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. अजित यांनी महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातून पदवी संपादन केली आहे. अजितदादा सुरुवातीला शरद पवारांचे खासगी सचिव होते. बालपणाची आठवण सांगताना ते म्हणाले होते, मी सुरुवातीपासूनच माझ्या काकांना घाबरत होतो, पण आम्हा भावंडांमध्ये नेहमीच प्रेम होते. मला वाटते की पक्ष आणि कुटुंब वेगळे ठेवले पाहिजेत. अजित यांनी महाराष्ट्राचे माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्या बहीण सुनेत्रा पवार यांच्याशी विवाह केला आहे. त्यांना जय पवार आणि पार्थ पवार अशी दोन मुले आहेत. सुप्रिया सुळे या अजित यांच्या चुलत बहीण आहेत.

अजित पवार १९८२ मध्ये पुण्यातील एका सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर निवडून आले. यामुळे त्यांच्या सक्रिय राजकीय कारकिर्दीची सुरुवात झाली. त्यांचे काका शरद पवार यांच्या निगराणीखाली त्यांनी झपाट्याने प्रगती केली. अजित पवार पहिल्यांदा १९९१ मध्ये बारामती येथून लोकसभेचे खासदार झाले, परंतु त्यानंतर त्यांनी शरद पवारांसाठी ही जागा सोडली. त्याच वर्षी ते बारामती येथून आमदार झाले आणि त्यानंतर १९९५, १९९९, २००४, २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये सलग विजयी झाले. त्यांनी सिंचन, वित्त, कृषी आणि ग्रामीण विकास अशी महत्त्वाची खाती सांभाळली. त्यांनी महाराष्ट्राचे अनेक वेळा उपमुख्यमंत्री म्हणून काम केले आणि डिसेंबर २०२४ पासून देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये पुन्हा उपमुख्यमंत्री म्हणून काम केले. महाराष्ट्रातील सहकारी संस्था आणि विविध शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक संस्थांसाठीही त्यांनी विशेष भरीव काम केले.

काहीही पोटात न ठेवता, थेटपणे बोलणारा माणूस. एवढा कणखर, मनमोकळा आणि दिलखुलास नेता मी दुसरा पाहिला नाही. अजित पवार हे यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणाच्या तालमीत तयार झालेले, त्या विद्यापीठाचे राजकारणी. सत्ता मिळवायची. टिकवायची. त्यासाठी सगळे अपराध मान्य. मात्र, ही सत्ता लोकांसाठी आहे, हे कधी विसरायचे नाही. संसदीय राजकारणाची शिस्त समजणारे होते. उभा-आडवा महाराष्ट्र त्यांना माहीत होता. अजित पवारांनी कधीही जातीचे राजकारण केले नाही. कधीच धर्माचे राजकारण केले नाही. लोकांचे काम करा आणि निवडून या, हा त्यांचा साधा खाक्या होता. अर्ध्या रात्रीही अजित पवार लोकांसाठी उभे असायचे. सतत काम करत असायचे. शरद पवार नावाच्या वटवृक्षाखाली वाढत असताना, एवढी स्वतंत्र उंची मिळवणे, ही सोपी गोष्ट नाही. काकांचेच बोट धरून ते राजकारणात आले, हे खरे, पण त्यानंतर त्यांनी आपली स्वतःची ओळख तयार केली. ती स्वतःच्या कर्तबगारीने तयार केली. अहोरात्र मेहनत करून, लोकांमध्ये जाऊन, स्वतःचे लोक मिळवून आपली ओळख त्यांनी तयार केली. कुटुंबात धाक, पक्षात दरारा, समाजात भितीयुक्त आदर, मित्रपक्षांसह विरोधकांमध्येही प्रेमाने सन्मान, प्रशासनावर मजबूत पकड तर प्रशासनातले अधिकारी त्यांना घाबरत, कारण त्यातील ओळ ना ओळ त्यांना ठाऊक असे. महाराष्ट्राच्या राजकारणात ज्यांना राजकीय धुरंधर म्हणून ओळखले जाते असे अजितदादांचे काका शरद पवार यांनाही त्यांनी वयोमानानुसार आता राजकारणातून निवृत्त व्हा आणि आम्हाला मार्गदर्शन करा असे ठामपणे न घाबरता सांगितले, असा हा खर्या अर्थाने महाराष्ट्राचा लाडका असणारा 'दादा' हरपला. अजितदादांच्या अपघाती निधनानंतर अवघा महाराष्ट्र हळहळतोय, रडतोय, नेते अश्रू ढाळताहेत तर मित्रपक्षांसह विरोधकांच्या चेहर्यावरही दुःखाचे सावट आहे हीच खरी ते महाराष्ट्राचे लाडके दादा होते याची पोचपावती होय.

लोकांचे काम करा आणि निवडून या हा संदेश आपल्या सहकारी व कार्यकर्त्यांना देणारे अजितदादा यांचा दिवस पहाटेपासूनच सुरु व्हायचा तर तर सकाळीपासूनच ते नागरिक, कार्यकर्ते, नेत्यांना भेटायचे. जे काम होणारे आहे ते करणारा आणि जे होणार नाही ते होणार नाही असे स्पष्ट सांगणारा नेता, वेळ पाळणारा, शब्द दिल्यानंतर तो खरा करणारा, काही चुकत्यास कबुली देवून प्रायश्चित घेत आत्मक्लेष करणारा, स्पष्टवक्ता, प्रसंगी रागिष्ठ तर प्रसंगी प्रेमळ कधी रागाने बोलण-ारा तर कधी विनोद, हसीमजाक करूर समोरच्यांची मने जिंकणारे, पत्रकारांवर देखील प्रसंगी रागावणारे तर वेळेप्रसंगी आपुलकीने विचारपूस करणारे अजित दादा यांनी आपल्या राजकीय व्यक्तीमत्वाची सोडलेली आगळीवेगळी छाप महाराष्ट्र कधीच विसरू शकणार नाही. उपमुख्यमंत्रीपदावर विक्रमी निवड होणारे अजितदादा यांची मुख्यमंत्रीपदाची इच्छा मात्र अपुरीच राहिली. अजितदादा तूम्हाला महाराष्ट्र कधीच विसरू शकणार नाही, कारण तूम्हीच खर्या अर्थाने महाराष्ट्राचे लाडके दादा होते.

**–प्रशांत माने,**

मुख्य संपादक.

(मो.९८८११९१४४३)

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राज्यातील राजकारणाचा किंगमेकर; काकाच्या सावलीतून बाहेर येवून बनविले होते स्वतः चे स्थान !

**तभा वृत्तसेवा /जमीर काझी**

**मुंबई, दि. २८ जानेवारी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकस्मित अपघाती निधनामुळे राज्यातील राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे .गेल्या साडेतीन दशकाहून अधिककाळ राज्यातील राजकारणात सातत्याने चर्चेत राहिलेल्या अजित दादांनी काका शरद पवारांच्या बोटाला धरून सार्वजनिक व राजकीय जीवनात प्रवेश केला. त्यांच्या सावलीत राहून महत्वाची सत्तापदे मिळवली आणि स्वतः चे स्थानही निर्माण केले होते. महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी कुटुंबात जन्मलेल्या अजित पवार यांनी पाच वेळा राज्याचे उप मुख्यमंत्रीपद भूषविले. त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा थोडक्यात घेतलेला हा आढावा ..

काका शरद पवारांचा राजकीय प्रवास राज्य व देशात झपाट्याने वाढत राहिल्यानंतर बारामती व पुण्यात जी पोकळी निर्माण होत होती ती भरून काढण्याचे काम अजित पवारांनी केले . १९८२ पासून साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांमधून त्यांचा वावर सुरू झाला होता.मात्र १९९१ हे वर्ष त्यांच्या राजकीय आयुष्याला निर्णायक वळण देणारे ठरले . पवार कुटुंबाचा होमग्राऊंड असलेल्या बारामतीतून ते थेट लोकसभेत निवडून गेले. लोकसभा तिकिटाचा किस्सा अजित पवारांनीच एका मुलाखतीत सांगितला. तेव्हा राष्ट्रवादी काँग्रेस अस्तित्वात नव्हती. राजीव गांधी काँग्रेसचे सर्वेसर्वा होते आणि उमेदवारीची अंतिम घोषणा त्यांच्याकडूनच होत असे. महाराष्ट्रात बारामती आणि कराड या दोन जागांवरील उमेदवार सर्वात शेवटी जाहीर झाले. बारामतीतून अजित पवार आणि कराडमधून पृथ्वीराज चव्हाण. दोघांचीही लोकसभेत एकत्र एन्ट्री झाली. पुढे तब्बल दोन दशकांनंतर हीच जोडी महाराष्ट्राच्या सत्ताकेंद्रात मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री म्हणून पुन्हा एकत्र आली. मात्र, अजित पवारांच्या राजकीय प्रवासातला सर्वात निर्णायक क्षण आला तो खासदारकीचा राजीनामा देण्याचा. पी. व्ही. नरसिंह राव यांनी शरद पवारांना संरक्षणमंत्री म्हणून केंद्रात बोलावल्यावर संसदेचं सदस्यत्व आवश्यक होते . सुरक्षित मतदारसंघ बारामती होता आणि तिथून काही महिन्यांपूर्वीच अजित पवार निवडून आले होते. काकांसाठी अजित पवारांनी खासदारकी सोडली आणि हा निर्णय त्यांच्या राजकीय निष्ठेचं प्रतीक मानला जातो. दिल्लीतील तीन-चार महिन्यांचा मुक्काम संपवून अजित पवार त्याच वर्षी बारामतीतून विधानसभेत पोहोचले. तेव्हापासून आजतागायत साडेतीन दशके बारामती हा अजित पवारांचा अभेद्य गड राहिला आहे. सलग सात वेळा आमदार म्हणून निवडून आले.खासदार ते आमदार, मंत्री ते उपमुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते ते पुन्हा सत्तेच्या केंद्रस्थानी अजित पवारांचा प्रवास हा सातत्य, संघर्ष आणि सत्तेच्या राजकारणातील चढउतार यांचं प्रतिबिंब आहे. १९९१ मधल्या त्या पहिल्या पावलानं महाराष्ट्राच्या राजकारणात 'अजित पवार' नावाचा स्वतंत्र अध्याय सुरू झाला, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

सत्तेच्या राजकारणात ते पक्षाचा कणा ठरले : राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून पक्षविस्तारापर्यंतची मोठी जबाबदारी अजित पवारांनी समर्थपणे सांभाळली. संघटन बांधणी, निवडणूक व्यवस्थापन आणि सत्तेच्या राजकारणात ते पक्षाचा कणा ठरले. मात्र, शरद पवार यांचे राजकीय उत्तराधिकारी म्हणून सुप्रिया सुळे यांच्याच नावाला मिळणारी पसंती आणि पक्षांतर्गत जाणवणारा दुजाभाव, या बाबी अजित पवारांच्या मनात अस्वस्थता निर्माण करणाऱ्या ठरल्या. या अस्वस्थतेचे उघड प्रकटीकरण २०१९ मध्ये घडले. विधानसभा निवडणूक निकालानंतर राजकीय अस्थिरता निर्माण झाली असताना देवेंद्र फडणवीस यांच्याशी हातमिळवणी करत पहाटेचा शपथविधी उरकून अजित पवारांनी बंडाचा प्रयत्न केला. मात्र,हा प्रयत्न फार काळ टिकला नाही. सत्तास्थापनेसाठी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांनी एकत्र येत महाविकास आघाडी स्थापन केली. त्या वेळी अजित पवारांनी सत्तेतच राहण्याचा निर्णय घेतला. तरीही पक्षात 'अजित पवार गट' आणि 'शरद पवार गट' अशी विभागणी कार्यकर्त्यांमध्ये स्पष्टपणे जाणवू लागली. ही चर्चा २०२३ मध्ये अजित पवारांनी केलेल्या बंडानंतर प्रत्यक्षात उतरली. त्यांनी केवळ वेगळी वाटचालच निवडली नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरही दावा सांगितला. पक्षाचं नाव आणि निवडणूक चिन्ह स्वतःकडे ठेवण्याची इच्छा व्यक्त करत, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीपासून वेगळा अध्याय सुरू करण्याचे संकेत दिले. अखेर २ जुलै २०२३ रोजी अजित पवारांनी महायुतीसोबत हातमिळवणी केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राष्ट्रवादी काँग्रेसमधील दीर्घकाळ साचलेल्या अंतर्गत संघर्षाचा हा निर्णायक टप्पा ठरला होता.मात्र गेल्या दोन -अडीच महिन्यापासून विशेषतः महापालिका निवडणुका जाहीर झाल्यापासून काका-पुतणे यांच्यातील राजकीय विरोध मावळून ते एकत्र आले होते.जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणुकाही दोन्ही पक्ष एकत्र लढत असल्याने आगामी काळात दोन्ही पक्षाचे विलीनीकरण होईल ,अशी चर्चा उघडपणे रंगत असतानाच अजित दादाच्या अकाली अस्तामुळे राज्यातील राजकारणात मोठी पोकळी निर्माण करून गेली .




## अजित पवार : राजकीय प्रवास

**कार्यकाळ**

१९९१ - २०२६ : सलग ३२+ वर्षे सक्रिय राजकारण

१९९१ - आजतागायत : बारामतीतून ७ वेळा आमदार

**संसद ते विधानसभेपर्यंत**

जून १९९१ - सप्टेंबर १९९१ : खासदार

१९९१ - १९९५ : पहिल्यांदा आमदार

१९९५ - २०२६ : सलग आमदारकी

**मंत्रिपदांचा आलेख**

१९९१ - १९९२ : कृषी फलोत्पादन, ऊर्जा राज्यमंत्री

१९९२ - १९९५ : जलसंधारण, ऊर्जा राज्यमंत्री

१९९९ - २००४ : पाटबंधारे, फलोत्पादन मंत्री

२००४ - २००९ : जलसंपदा, पाटबंधारे मंत्री

२००९ - २०१० : जलसंपदा, ऊर्जा मंत्री

**उपमुख्यमंत्री म्हणून पदभार**

२०१० - २०१२ : उपमुख्यमंत्री (वित्त नियोजन, ऊर्जा)

२०१२ - २०१४ : उपमुख्यमंत्री (वित्त, नियोजन, ऊर्जा)

२०१९ : उपमुख्यमंत्री (८० तास)

२०१९ - २०२२ : उपमुख्यमंत्री (वित्त, नियोजन)

२०२३ - २०२६ : उपमुख्यमंत्री, वित्त मंत्री

**इतर भूमिका**

२०२२ - जुलै २०२३ : विरोधी पक्ष नेते



माझे मित्र आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं निधन झालं. महाराष्ट्राच्या राजकारणाने एक उमदा नेता गमावला. अजित पवार यांचा आणि माझा राजकारणातला प्रवेश हा काहीसा एकाच काळातील, अर्थात आमचा परिचय हा बराच नंतरचा. पण राजकारणावर कमालीचं प्रेम या एका गुणावर अजित पवारांनी महाराष्ट्राच्या राजकारणात खूप मोठी झेप घेतली. अजित पवार हे पवार साहेबांच्या मुशीत जरी तयार झालेले नेते असले, तरी त्यांनी नंतर स्वतः ची स्वतंत्र ओळख निर्माण केली. आणि ही ओळख महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ठसवली.

१९९० च्या [illegible]कांत महाराष्ट्रात शहरीकरणाने वेग पकडला. ग्रामीण भाग अर्धशहरीपणाकडे झुकू लागला, तरी तिथल्या राजकारणाचा बाज हा ग्रामीणच होता, जरी तिथल्या प्रश्नांचं स्वरूप हे काहीसं शहरी होत चाललं असलं तरी. या पद्धतीच्या राजकारणाचा पूर्ण अंदाज आणि ते उत्तम पद्धतीने कसं हाताळायचं याचं कसब अजित पवारांकडे होतं. पिंपरी चिंचवड आणि बारामती ही त्याची दोन उत्तम उदाहरणं. पिंपरी चिंचवड असेल की बारामती असेल अजित दादांनी या भागांचा कायापालट केला हे त्यांचे राजकीय विरोधक पण मान्य करतील.



प्रशासनावर अचूक पकड आणि एखाद्या फाईलीचा गुंता सोडवताना त्याची गाठ नक्की कुठून सोडवायची याचं अचूक ज्ञान असलेला हा नेता होता. प्रशासन हे सत्ताधाऱ्यांच्या पेक्षा वरचढ होण्याच्या काळात असा नेता महाराष्ट्राने गमावणं हे अतिशय दुर्दैवी आहे.

अजित पवार हे कमालीचे स्पष्टवक्ते होते. काम होणार नसेल तर ते तोंडावर सांगायचं आणि होणार असेल तर त्यासाठी ते सगळी शक्ती लावायचे. आश्र्वासनं देऊन स्वतः भोवती माणसांचा पिंगा घालायचा हा त्यांचा स्वभाव नव्हता. राजकारणात सडेतोडपणाची आणि स्पष्टवक्तेपणाची किंमत मोजावी लागते, त्याचा अनुभव मला पण आहे आणि त्यामुळे ती अजित पवारांना पण किती मोजायला लागली असेल याचा अंदाज करता येतो.

अजित पवारांच मला आवडणारं अजून एक वैशिट्य म्हणजे ते अजिबात जातीय नव्हते आणि त्यांच्या राजकरणात जातीपातीला अजिबात स्थान नव्हतं. सध्याच्या राजकारणात जातपात न मानता राजकारण करण्याचं धारिष्ट्य दाखवणारेच नेते कमी उरलेत, त्यात अजित पवार हे अग्रणी होते हे नक्की.

राजकारणातला विरोध हा राजकीय असतो, तो व्यक्तिगत नसतो. त्यामुळे एकमेकांवरची जहरी टीका ही व्यक्तिगत घ्यायची नसते, हे भान असलेले नेते महाराष्ट्रात कमी होत चालले आहेत. राजकारणातले दिलदार विरोधक एका मागे एक जाणे हे महाराष्ट्राच्या उमद्या राजकारणाचं मोठं नुकसान आहे. मी आणि माझं कुटुंबीय पवार कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे अजित पवारांना भावपुर्ण श्रद्धांजली.

**-राज ठाकरे**



अजितदादांकडून महाराष्ट्राच्या अजून खूप मोठ्या कार्याच्या अपेक्षा असतानाच त्यांचे अपघाती निधन आम्हा सर्वांच्या राजकीय जीवनात कायमस्वरूपी पोकळी निर्माण करणारे आहे. राष्ट्रवादी परिवारातील आम्हा सर्व सहकाऱ्यांच्या आयुष्यातील आजचा दिवस सर्वात वाईट दिवस आहे असेच म्हणावे लागेल. अजितदादांच्या निधनाची बातमी ही अक्षरशः सुन्न करून टाकणारी आहे. अजितदादा आणि माझे गेल्या जवळपास ३५ ते ४० वर्षांपासूनचे मैत्रीपूर्ण संबंध होते. प्रदीर्घकाळ आम्ही एकत्र काम केले. महाराष्ट्राच्या राजकीय सार्वजनिक जीवनाला अजितदादा पवार यांच्याकडून अजून मोठ्या कार्याची अपेक्षा असतानाच अशा प्रकारे अजित दादांचे अपघाती निधन आम्हा सर्वांच्या राजकीय जीवनात एक कायमस्वरूपी पोकळी निर्माण करून गेलेले आहे. दादांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचे जे नुकसान झाले आहे ते नुकसान कधीही भरून निघणार नाही. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक सर्वाधिक उत्तम प्रशासक व एक अत्यंत मोठा लोकनेता महाराष्ट्राने कायमचा गमावला आहे. अजित दादांची उणीव कायम भासत राहील.

**- जयंत पाटील**



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत धक्कादायक आणि दुःखद आहे. त्यांच्या निधनाने जवळपास चारहून अधिक दशके महाराष्ट्राच्या समाजकारणात सेवा देणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व हरपले. प्रशासनावर असलेली त्यांची पकड, सहकार क्षेत्राची जाण, निर्णयक्षमता आणि कामातील शिस्त तसेच जनसामान्यांसाठी अखंड झटण्याची वृत्ती यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण केले होते. राज्याच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले निर्णय, दाखवलेली कार्यतत्परता आणि जबाबदारीची जाणीव असंख्य कार्यकर्त्यांसाठी पथदर्शी ठरेल. त्यांचे विचार, कार्य आणि नेतृत्वाचा ठसा हा महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक इतिहासावर कायमस्वरूपी कोरला गेलेला आहे. अजितदादा पवार यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली! त्यांच्या आत्म्यास शांती लाभो तसेच या दुःखातून सावरण्याचे त्यांच्या कुटुंबीयांना बळ मिळो अशी ईश्वर चरणी प्रार्थना.

**- नितेश राणे**



दिलेला वेळ आणि शब्द पाळणारे, अशी ख्याती असलेले राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार अचानक वेळेआधी आपल्याला सोडून गेले... आज दिनांक २८ जानेवारीचा दिवस या अतिशय धक्कादायक आणि दुःखद घटनेने उजाडला ज्यामुळे आपण सर्वच शोकमग्न झालो आहोत. अजितदादा आपल्यात नाहीत हे स्वीकारायला मन अजूनही तयार नाही, इतकी ही घटना अनपेक्षित आणि खोल वेदनादायी आहे. वक्तशीरपणा, स्पष्टवक्तेपणा, प्रशासनिक नैपुण्य, संवेदनशील नेतृत्व आणि या सर्वांचा आधार असलेले धडाडीचे विकासोन्मुख राजकारण, असे त्यांच्या विलक्षण कार्यकर्तृत्वाचे योगदान महाराष्ट्र सदैव स्मरणात ठेवेल. पवार कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सर्व सहभागी आहोत. माझी अजितदादा यांना आणि या दुर्दैवी विमान अपघात घटनेत प्राण गमवावे लागलेल्या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली... ओम् शांती.

**- महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे**



अजितदादादांशी माझे ऋणानुबंध राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेच्या आधीपासून आहेत. करारी, रोखठोक स्वभाव असलेल्याअजितदादांनी विचारांशी कदापि तडजोड केली नाही. मला वाटतं हेच त्यांच्या आणि माझ्या स्वभावातील साम्य होतं. त्यांनी शरद पवार साहेबांच्या नेतृत्वात बारामतीच्या स्थानिक राजकारणापासून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. पवार साहेबांप्रमाणेच महाराष्ट्रातील जनतेची नस ओळखणारा आणि सर्वसामान्यांशी जोडला गेलेला नेता अशी त्यांची ओळख होती. याच जोरावर त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतः ची वेगळी ओळख निर्माण केली, महाराष्ट्राच्या राजकारणावर अमीट ठसा उमटविला. स्वभावाने रोखठोक, प्रशासनावर घट्ट पकड आणि व्यक्तिमत्वात एक दरारा असलेला राजकारणी अशी प्रतिमा असूनही मनाने अतिशय स्वच्छ आणि जिंदादिल असलेल्या अजितदादांचा वावर चैतन्य निर्माण करणारा असायचा. पत्रकारांशी बोलताना प्रतिकूल असलेल्या प्रश्नांवरही मिश्किल चिमटे काढणारे दादा, अनावधानाने काही चूक झाली असेल तर मोठ्या मनाने दिलगिरी व्यक्त करणारे दादा देखील या महाराष्ट्राने पाहिले आहेत.

**- छगन भुजबळ**

## अजित पवारांच्या विमानाचा अपघात कसा झाला, काय होतं कारण?



**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. २८ जानेवारी :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मुंबईहून बारामतीला जाताना विमान अपघातात निधन झाले. लँडिंगच्या वेळी झालेल्या या दुर्घटनेत विमानात असलेले सर्व पाच जण मृत्युमुखी पडले आहेत. दाट धुके आणि कमी दृश्यमानता हे या अपघाताचे मुख्य कारण असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

बारामतीमध्ये झालेल्या या विमान दुर्घटनेचे प्राथमिक कारण खराब हवामान आणि कमी दृश्यमानता मानले जात आहे. अपघाताच्या वेळी बारामती येथील लँडिंग स्ट्रिप (धावपट्टी) परिसरात दाट धुके होते, ज्यामुळे दृश्यमानता केवळ ८०० मीटरपर्यंत आली होती. याच कमी दृश्यमानतेत विमान उतरवण्याचा प्रयत्न केला गेला, ज्या दरम्यान हा अपघात घडला, असं सांगितलं जात आहे.

या दुर्घटनेची गंभीरता यावरून लक्षात येते की, अपघातानंतर मृतदेहांची ओळख पटवणेही कठीण झाले होते. अपघातानंतर मृतदेह ओळखण्याच्या स्थितीत नव्हते आणि त्यांची ओळख कपड्यांवरून पटवावी लागली. प्राथमिक माहितीनुसार, हा अपघात धुके आणि कमी दृश्यमानतेमुळे झाला आहे.

अजित पवार मुंबईहून बारामतीला जात होते. त्यांना तेथे निवडणुकीच्या प्रचारासाठी चार कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हायचे होते. जिथे हा अपघात झाला, तो बारामतीजवळील शेतजमिनीचा भाग आहे. विमान जमिनीवर कोसळताच आग लागली. विमान हे धावपट्टी सोडून शेजारील भागात कोसळले. लँडिंग करताना विमानाचे नियंत्रण बिघडले होते. लँडिंगचा प्रयत्न करताना विमान अडखळले आणि काही क्षणातच हा अपघात झाला. कोसळल्यानंतर सुमारे पाच स्फोट झाले आणि विमानाला भीषण आग लागली. अपघातानंतर विमान पूर्णपणे जळून खाक झाले आणि त्यात असलेले सर्व प्रवासी मृत्युमुखी पडले.

या घटनेने संपूर्ण राज्याला धक्का बसला आहे. अशाप्रकारे अजित दादा हे आता आपल्यात नाहीत यावर कोणाचाही विश्र्वास बसत नाहीये. बारामतीत ज्या रुग्णालयात दादांचं पार्थिव ठेवण्यात आलं, त्याबाहेर कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली आहे. यावेळी कार्यकर्ते मोठा आक्रोश करताना दिसत आहेत. दादा परत या, अशा घोषणा देताना पाहायला मिळत आहेत. हे दृश्य मन सुन्न करणारं आहे.

## शोकसंदेश



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या बातमीवर बोलतांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्या मनात माझा मोठा भाऊ हरपला अशी भावना आहे, अशा शब्दांमध्ये त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. अजित पवार यांच्या विमानाला आज बुधवार २८ जानेवारी रोजी बारामती येथे मोठा अपघात झाला. या अपघातात अजित पवार यांचा मृत्यू झाला असून त्यांच्यासह अजून सहा जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात अजित पवार यांचं विमान जळून खाक झालं.

मनाला चटका आणि वेदना देणारी ही घटना आहे. अजितदादा आपल्याला इतक्या लवकर सोडून जातील असा विचारही कोणी केला नसेल. दादा गेली अनेक वर्षे महाराष्ट्राचे नेतृत्त्व करत होते. अतिशय परखड व्यक्तिमत्व होतं त्यांचं. चूक त्याला चूक म्हणणारे ते असले तरी ते मनाने अतिशय निर्मळ होते, याचा अनुभव मी घेतला आहे. मी त्यांच्यासोबत अनेक वर्षे काम केलं आहे. अजितदादा यांना काम करताना वेळेच भान नसायचं. सकाळी ६ वाजता देखील ते लोकांना भेटायचे. परवाच आमची एका कार्यक्रमात भेट झाली होती. वयाने आणि अनुभवाने ते माझ्यापेक्षा मोठे होते, त्यामुळेच मला माझा मोठा भाऊ हरपला असं वाटत आहे.

**- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**


-----------------------------



अजित दादांची बातमी ही धक्कादायक आहे! शब्दच नाहीत. दादांसोबत गेले ५-६ वर्षं काम करण्याची संधी मिळाली पहिलं सरकारमध्ये आणि नंतर काही दिवस विरोधी पक्षात. त्यांची विधिमंडळ कारभारावर असलेली रुबाबदार पकड आणि प्रेमळ स्वभाव हा आमच्यासारख्या अनेकांना आवडायचा. मी हे विरोधी पक्षात असताना देखील अनेकदा जाहीरपणे म्हटलं होतं. आजची बातमी खरंच धक्का देणारी आहे.अजित दादांना आणि दुर्घटनेतील त्यांच्या सहकाऱ्यांना विनम्र श्रद्धांजली.

**- आदित्य ठाकरे**

-----------------------------



अजित पवार यांच्या निधनाची बातमी ऐकून खूप दुःख झाले. महाराष्ट्रासाठी काम करणारा एक चांगला नेता आज आपण अचानक गमावला आहे. पवार कुटुंबियांच्या दुःखात मी सहभागी आहे. ईश्र्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

भावपूर्ण श्रद्धांजली. शांती.

**- सचिन तेंडुलकर**

-----------------------------


काय गं प्रणिती...अजित दादांचे शब्द मला आठवतायत; प्रणिती शिंदे दादांच्या आठवणीत भावूक



खासदार प्रणिती शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं, आजही त्यांचे शब्द मला आठवतायत, काय गं प्रणिती असे त्यांचे वाक्य असायचे. मी आमदार झाल्यावर अजित पवारांनी मला नेहमी मार्गदर्शन केले. आज सकाळी त्यांच्या बाबत बातम्या येत होत्या, त्यावेळी आम्ही प्रार्थना करत होतो आणि अंगावर शहारे येत होते. पण त्यांच्या मृत्यूचीच बातमी समोरआली, अशी प्रतिक्रिया देताना काँग्रेस खासदार प्रणिती शिंदें भावुक झाल्या होत्या.

**-प्रणिती शिंदे**

-----------------------------



युसूफ पठाण यांनी ट्विट केले की, महाराष्ट्राचे माननीय उपमुख्यमंत्री श्री अजित पवार यांचे विमान अपघातात अकाली निधन झाल्याने खूप दुःख झाले. ते एक समर्पित नेते होते ज्यांनी समर्पण आणि प्रामाणिकपणाने राज्याची सेवा केली. सार्वजनिक सेवेतील आणि राज्याच्या विकासातील त्यांचे योगदान नेहमीच लक्षात ठेवले जाईल. या दुःखाच्या वेळी माझे विचार आणि प्रार्थना त्यांच्या कुटुंबासोबत, समर्थकांसोबत आणि राज्यातील जनतेसोबत आहेत. त्यांच्या दिवंगत आत्म्याला शांती लाभो.

**-युसूफ पठाण**

-----------------------------



माझे सहकारी मित्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाची बातमी मन सुन्न करून टाकणारी आहे. राजकारणाच्या प्रदीर्घ वाटचालीत अनेक संघर्ष, मतभेद आणि प्रसंग आले, पण त्या सर्वांच्या पलीकडे जाऊन अजितदादा हे एक निर्भीड, ठाम निर्णय घेणारे आणि कार्यक्षम नेतृत्वाचे प्रतीक होते. सत्तेच्या केंद्रस्थानी असतानाही सामान्य माणसाच्या वेदनांशी नातं जपणारा, परिस्थिती कितीही कठीण असली तरी मागे न हटणारा असा खंबीर कणखर नेता महाराष्ट्राने आज गमावला आहे. त्यांची कार्यशैली, स्पष्ट भूमिका आणि जबाबदारीची जाणीव ही पुढील पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील. शब्दांपेक्षा कृतीवर विश्र्वास ठेवणारा, जबाबदारीला कधीच पाठ न फिरवणारा आणि जनतेच्या प्रश्नांसाठी कायम सज्ज असणारा असा अजितदादांचा स्वभाव होता. त्यांच्या जाण्याने राज्याच्या सार्वजनिक जीवनात एक खोल व वेदनादायक पोकळी निर्माण झाली आहे. या दुःखद क्षणी त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात मी सहभागी आहे. ईश्र्वर त्यांच्या परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हीच प्रार्थना.

**- माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामतीत विमान अपघातात दुर्दैवी निधन

## आज सकाळी ११ वाजता विद्या प्रतिष्ठान येथे होणार अंत्यसंस्कार, पंतप्रधान, गृहमंत्री यांची हजेरी

**परभणी,/प्रतिनिधी:** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाले असून त्यांचा पार्थिवावर आज सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार असून यावेळी कार्यकर्त्यांत मोठी शोककळा पसरली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आज दिनांक २८.०१.२०२६ रोजी विमान अपघातात दुःखद निधन झाले आहे, त्यामूळे दिनांक २८.०१.२०२६ ते दिनांक ३०.०१.२०२६ या कालावधीत राज्यभर दुखवटा पाळण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी दररोज नियमीत राष्ट्रध्वज फडकविण्यात येतो त्या ठिकाणी दिनांक २८.०१.२०२६ ते दिनांक ३०.०१.२०२६ या कालावधीत राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकविण्यात येणार आहे. शासनाने दिलेल्या सूचनेप्रमाणे परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीवरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकविण्यात आला आहे. सदर कालावधीत परभणी जिल्हयात कोणतेही मनोरंजनाचे शासकीय कार्यक्रम आयोजीत करण्यात येवु नयेत. दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी राज्यातील सर्व शासकीय कार्यालये बंद ठेवण्याचे जाहीर केले आहे. दिनांक ३१.०१.२०२६ रोजीपासुन राष्ट्रध्वज पुर्ण फडकविण्यात यावा , असे कळविण्यात आले आहे.




## संक्षिप्त वृत्त...

### मतदार दिना निमित्त मानवत शहरात जनजागर रॅली



**मानवत,/प्रतिनिधी-** परभणी येथील मेरा युवा भारत व येथील नगर परिषद कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी दिनांक २५ जानेवारी मतदार दिवस साजरा करून शहरात जणजागर पदयात्रा काढण्यात आली. हि पदयात्रा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारक ते मानवत नगर पालिका कार्यालया पर्यंत काढण्यात आली. यावेळी मतदार जनजागर रॅली मध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या विदयार्थीनी पदयात्रेत सामील झाल्या. मानवत तहसिलचे तहसिलदार मा.श्री. पांडुरंग माचेवाड व मानवत नगर परिषदच्या मुख्याधिकारी श्रीमती कोमलताई सावरे यांनी हिरवा झेंडा दाखवला. कार्यक्रमाचा समारोपात मानवत नगर परिषद मध्ये नवीन नोंदणी केलेले मतदारांचे यावेळी स्वागत करण्यात आले तसेच मतदार दिनाची प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व मान्यवराचे आभार प्रदर्शन जिल्हा युवा अधिकारी शशांक रावुला यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती स्नेहाताई वाघमारे, मैथिलीताई जोशी, सुनिताताई वाकळे, स्वप्ना माथवाले, सुनीताताई नाईक, संगीताताई राऊत, सय्यद वसीम , एस. आय. गवारे यांनी परिश्रम घेऊन प्रयत्न केले.

### योगेश देशमुख भोगावकर यांची निवड

**जिंतूर-** तालुक्यातील भोगाव देवी येथील योगेश देशमुख भोगावकर यांची अजितदादा राष्ट्रवादी गटाच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाच्या जिंतूर तालुका अध्यक्षपदी निवड चे पत्र जिंतूर सेलू माजी आमदार विजयराव भांबळे यांच्या हस्ते देण्यात आले यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिंतूर तालुका अध्यक्ष लक्ष्मण दादा बुधवंत शिव उपस्थित होते योगेश देशमुख यांचे निवड झाल्याबद्दल त्यांच्या मूळ गावी भोगाव येथे फटाके यांच्यातील त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले या यावेळी योगेश देशमुख म्हणाले की जिंतूर सेलू विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार विजयराव भांबळे व पक्षाचे अध्यक्ष अजित दादा पवार यांनी माझ्यावर जिम्मेदारी टाकली ती यशस्वीरित्या वार करणार अशी ती म्हणाली व जिल्हा परिषद समिती त जिंतूर तालुक्यातील दहा सर्कल मधील जास्तीत जास्त उमेदवार निवडूनआणण्याचा प्रयत्न करणार असे ते म्हणाले.



### श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयात क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन संपन्न



**जिंतूर :-** येथील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयात क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य खंडेराव भिसे, उद्घाटक श्री. रमेशराव भराड तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अनुप सोळंके, प्राचार्य कैलास मुटकुळे व पत्रकार सचिन रायपत्रीवार यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम श्री सोळंके यांनी खेळा प्रती स्नेहभाव निर्माण व्हावा यासाठी उपस्थित विद्यार्थ्यांना शपथ दिली. त्यानंतर उद्घाटक श्री. भराड यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. आपल्या छोटेखानी भाषणात ते म्हणाले की, तुम्हाला येत असलेला कोणताही एखादा खेळ कधी यश शिखरावर नेऊन पोहोचवेल, हे सांगता येत नाही. खेळामुळे बऱ्याच लोकांच्या जीवनामध्ये बदल झालेला आपणास पहावयास मिळतो, तसेच शरीर स्वास्थ्यासाठीही खेळ महत्वपूर्ण आहे. म्हणून आपण खेळाला महत्त्व दिले पाहिजे असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य भिसे यांनी खेळाच्या विविध प्रकारांवर थोडक्यात प्रकाश टाकला आणि स्पर्धेतील खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कृष्णा गजभारे तर आभार प्रदर्शन प्रा. जगदीश सोमानी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. मते, प्रा. तळेकर, प्रा.वर्णेकर ,प्रा. कापरे, प्रा. बोराळकर, प्रा. भिसे,प्रा. सोळंके ,प्रा. गणपुरकर, प्रा. लोणे मॅडम, प्रा. माकोडे, प्रा. घुगे, प्रा. पंढरपूरे, प्रा. सोमानी ,प्रा. वाघमारे मॅडम, प्रा काझी, प्रा. वाघ, प्रा आदाबे, श्री. तळेकर, श्री. दहिफळे, श्री पोटेकर, श्री. चव्हाण ,श्री. वट्टमवार, श्री. भवाळे, श्री. जाधव, श्री. देवकर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुणालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

### प्रभूकृपा विद्यालयात स्वयंशासन दिन साजरा(स्कूल-डे)



**जिंतूर,/प्रतिनिधी-** वाघी बोबडे येथील प्रभूकृपा माध्यमिक विद्यालयात आज २३ जानेवारी २०२६शुक्रवार रोजी स्वयंशासन दिन(स्कूल डे) संपन्न झाला.

या दिवशी विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शालेय प्रशासन कसे हाताळावे याचे

स्व:अनुभवातून ज्ञान घेतले. अनेक विद्यार्थ्यांनी खेळीमेळीच्या वातावरणात विविध विषय शिकवण्याचा प्रयत्न केला. मुख्याध्यापक ते शिपाई या सर्वांच्या भूमिका चोखपने पार पाडण्याचा प्रयत्न केला. परिपाठापासून सुरुवात करत राष्ट्रगीत गायनाने समारोप केला.

यामध्ये मुख्याध्यापकाची भूमिका युवराज आव्हाड, उपमुख्याध्यापक गणेश तिथे, लिपिक विठ्ठल गलांडे, शिपाई गणेश बोबडे , दत्ता राऊत यांच्यासह सर्वच विद्यार्थ्यांनी आपापल्या तासीकांमध्ये दैनंदिन शैक्षणिक कार्य पार पडले. या स्वयंशासन दिनाचे नियोजन वर्गशिक्षक श्री गजानन पाटील सर यांनी केले. शालेय प्रशासन एका दिवसासाठी कसे चालते तेव्हा कुठल्या विद्यार्थ्यांनी आपली भूमिका चांगली निभावली याचे मुख्याध्यापक संतोष साखरे सर व सर्व वर्गशिक्षक मंडळींनी निरीक्षण केले...

### जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत अबोली देशमुख प्रथम

**जिंतूर,/प्रतिनिधी-** नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती निमित्त भारतीय बालविद्या मंदिर प्रशाला परभणी येथे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जिजामाता विद्यालय जिंतुर येथील अबोली अभिजीत देशमुख हिने प्रथम क्रमांक पटकावला.

कै. नरेश कुचेरिया, कै. कैलासजी अबोटी व कै. डॉ. प्रवीणचंद्र वर्मा स्मृती जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन भारतीय बाल विद्या मंदिर प्रशाला, ममता नगर, परभणी येथे ता.२३ रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत जिजामाता विद्यालय जिंतूर येथील अबोली अभिजीत देशमुख हिने माध्यमिक गटातून प्रथम क्रमांक मिळवला. यावेळी उपशिक्षणाधिकारी गोविंद मोरे यांच्या हस्ते तिला २१०१ रुपये सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. तिच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक मनोहर कदम, संस्थेचे अध्यक्ष ब्रिजगोपाल तोष्णीवाल, सचिव रमन तोष्णीवाल, संचालिका पद्मा तोष्णीवाल यांनी अभिनंदन केले आहे.



### पाथरी तालुक्यात जि प, पं स निवडणुकीचे चित्र स्पष्ट;जि प २६ तर पं स साठी ५३ उमेदवार निवडणुक मैदानात

**पाथरी,/प्रतिनिधी:** तालुक्यातील जिल्हा परीषदेचे पाच गट आणि पंचायत समितीच्या दहा गणात एकून ७९ उमेदवार निवडणुक रिंगणात लढणार असल्याचे निवडणुक विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

मंगळवारी २७ जानेवारी रोजी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी १४५ उमेदवारां पैकी ६६ जनांनी आपली उमेदवारी मागे घेतली यात कासापुरी गटातून भाजपाच्या अधिकृत उमेदवाराने माघार घेतली तर देवनांद्रा गणातून शिवसेना(शिंदे) आणि भाजपाच्या उमेदवाराने ही माघार घेतली असल्याचे निवडणुक विभागाने सांगितले.

आता जिल्हापरिषदेच्या पाच गटा साठी एकुन २६ उमेदवार निवडणुक रिंगणात असून त्यात हादगाव गटात ४, देवनांद्रा ५, कासापुरी ७, बाभळगाव ७, तर सर्वात कमी लिंबा गटात, काँग्रेस, राकाँ, शिवसेना (शिंदे) अशी तिरंगी सरळ लढत पहायला मळणार आहे.

तर पंचायत समितीच्या दहा गणात ५३उमेदवार निवडणुक रिंगणात असतील त्यात हादगाव बु. ७, रेणाखळी ४, देवनांद्रा ४,देवेगाव ५, कासापुरी ७, रामपुरी खु. ५, बाभळगाव ६, कानसुर ७, लिंबा ३ ,तर वाघाळा पाच उमेवार निवडणुक रिंगणात असून पुढील सात दिवस निवडणुक मैदानात प्रचाराचा धुरळा उडताना पहायला मिळणार आहे.

### आडगांव जि प गटाच्या सर्वांगीण विकासाठी विकासनिधी खेचून आणणार - डॉ देवराव कऱ्हाळे

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक सन- २०२६ च्या अनुषंगाने आडगांव येथे भारतीय जनता पक्षाचे आडगांव जिल्हा परिषद गटातील लोकप्रिय व अधिकृत उमेदवार मा डॉ देवरावजी कऱ्हाळे साहेब व आडगांव पंचायत समिती गणातील भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार सौ अश्विनी बाळू दाभाडे यांच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे उद्घाटन ज्येष्ठ नेते तथा आदरणीय व्यक्तीमत्व ह भ प श्री झब्बुसींगजी नाईक यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले.

आडगांव जिल्हा परिषद गटातील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार श्री डॉ देवराव कऱ्हाळे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना आडगांव जि प गटाच्या सर्वांगीण विकास चळवळीस गती देण्याचा संकल्प केला असल्याचे सांगून जिल्याचे लोकनेते श्री रामप्रसादजी बोडकर व पालकमंत्री नामदार मेघनाताई साकोरे बोडकर यांच्या नेतृत्वात या सर्कलच्या सर्वांगीण विकासाठी विकासनिधी खेचून आणण्यात येईल व मुलभूत व पायाभूत विकास साधण्यात येणार असल्याचा शब्द उमेदवार श्री कऱ्हाळे यांनी यावेळी उपस्थितांना दिला.आडगांव जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील या निवडणूक प्रचार कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी श्री सुंदररावजी चव्हाण, किशनरावजी खंडागळे, प्रकाशराव दाभाडे, प्रल्हादराव दाभाडे, मंचकराव खंडागळे, विनायकराव दाभाडे, विश्वनाथ राऊत, मुरलीधर दाभाडे, अशोकराव ठोके, काशिनाथ राऊत, पांडुरंग गडदे, प्रसाद घोडके, बबनराव गडदे व यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांसह, भाजपा शक्ति केंद प्रमुख, सर्व बुथ प्रमुख, भारतीय जनता पक्षाचे सर्व कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक व मा रामप्रसादजी बोडकर मित्र परिवारातील सर्व सन्माननीय सदस्य बांधव, गावकरी व परिसरातील सर्व सहकारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### अवैध वाळूने भरलेला ट्रकटर कार्यवाही न करता तलाठ्याने सोडला

**जिंतूर,/प्रतिनिधी:** अवैध वाळूनेभरलेलाट्रकटरकार्यवाही न करता तलाठ्याने सोडला जिंतूर / प्रतिनिधी- तालुक्यातील करपरा नदी नदीपत्रातून अवैध वाळू उपसा करून वाहतूक करणारा ट्रकटर तलाठ्याने पकडला व सदरील ट्रकटर चालक मालकांवर कोणतीही कार्यवाही न करता परस्परच सोडून दिल्याने चर्चांना उधाण आले असून या बाबत महसुल प्रशासनाने चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी होत आहे या बाबत अधिक माहिती अशी की करपरा नदी पत्रातील वाळू साठ्याचा लिलाव झालेला नसतानाही या नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध रित्या वाळू उपसा होत आहे या बाबत माहिती मिळाल्यानंतर दुधगाव तलाठी शेख खलील हे कौडगाव शिवारात मंगळवार दि २७ जानेवारी रोजी दुपारी बारा ते एक वाजण्याच्या दरम्यान आले असता त्यांना रक वाळूने भरलेला ट्रकटर कौडगाव येथून दुधगाव कडे येतांना दिसला त्यांनी कौडगाव शिवारात संबंधित ट्रकटर चालकास थांबवून त्याच्या ट्राली मधील वाळू वाहतुकी बाबत परवान्याची मागणी केली असता सदरील ट्रकटर चालकाकडे कोणताही परवाना आढळून आला नसल्याने त्यांनी स्वतः ट्रकटर वर बसून तो दुधगाव बायपास रस्त्यापर्यंत आणला त्या ठिकाणी ट्रकटर चालक आल्यानंतर ते ट्रकटर वरून खाली उतरले व संबंधित ट्रकटर मालकांशी अर्थपूर्ण बोलणी झाल्यानंतर त्यांनी अवैध वाळूने भरलेल्या ट्रकटर वर कोणतीही कार्यवाही न करता तो तसाच परस्पर सोडून दिल्याने गावकऱ्यात आश्चर्य निर्माण झाले आहे चौकशी करून कार्यवाही करू :-तहसीलदार शीतल कच्छवे या बाबत गावातील जिजाराव दिनकर नागरे,मंगेश सुभाष नागरे,मदन विश्वनाथ नागरे, रामप्रसाद सदाशिव नागरे, यांच्या सह अनेक गावकऱ्यांनी बुधवार दि २८ जानेवारी रोजी सकाळी तहसीलदार शीतल कच्छवे यांची भेट घेऊन त्यांना तलाठी शेख खलील हे ट्रकटर वर बसल्याचे फोटो दाखवत सदरील ट्रकटर परस्पर अर्थपूर्ण बोलणी करून सोडून दिल्याचे सांगितले असता त्यांनी या बाबत चौकशी करून कार्यवाही करू असे सदरील गावकऱ्यांना सांगितले



## अग्रलेख...

# जल दिवाळखोरीचा इशारा

जात, धर्म, पंथ, भाषा, पक्ष, वर्ण, वंश अशा अनेकानेक भेदाभेदांची चर्चा उच्चरवाने करणाऱ्यांच्या देशात आपली अनेक क्षेत्रातली दिवाळखोरी दुर्लक्षित होत असते. ताजे उदाहरण पाण्याच्या दिवाळखोरीचे! आत्ता-आत्ता आलेला एक अहवाल असे म्हणतो की, ८०० कोटींच्या दुनियेत चारशे कोटी लोकांवर फार मोठे जलदुर्भिक्षाचे संकट घोंघावते आहे आणि त्यात भारतातील अनेक शहरांचा, प्रदेशांचा समावेश आहे. मानवी उत्क्रांतीच्या इतिहासात पाहिले तर असे दिसते की, पाण्याच्या काठाने अर्थात समुद्र आणि नद्यांच्या काठी संस्कृती फुलली. पाण्यामुळेच शेती बहरली आणि उद्योग विस्तारले. त्यामुळेच जलदेवता ही संकल्पना अनेक संस्कृतींमध्ये जन्माला आली. मानवी समुदायाने पाण्याच्या भरवशावर फार मोठी प्रगती आतापर्यंत साधली खरी. पण, मानवी हव्यासाने निसर्गाचा सत्यानाश केला. २१ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात प्रवेश करताना, याच मानवजातीने निसर्गाच्या सर्वांत मोठ्या दातृत्वाचा म्हणजे जलसंपदेचा 'चेक' बाऊन्स केला आहे. म्हणजे आपण ज्या संख्येने आहोत, त्या संख्येला पाणी देण्याची आपली क्षमता राहिलेली नाही. आपण 'जल टंचाई' या कल्पनेच्या पलीकडे गेलो आहोत आणि 'जल दिवाळखोरी'च्या टप्प्यावर पोहोचलो आहोत. हा टप्पा असा आहे की, जिथे निसर्गाची पाणी देण्याची क्षमता आणि आपली पाणी ओरबाडण्याची वृत्ती यांच्यातील ताळेबंद पूर्णपणे कोलमडला आहे. जल दिवाळखोरीसंबंधीचा अहवाल धक्कादायक आहे. जगातील सुमारे ४ अब्ज लोकांवरच्या संकटाचे वर्णन त्यात आहे. जगातील १८ टक्के लोक ज्या भारतात राहतात, तेथे केवळ ४ टक्के गोड्या पाण्याचे स्रोत आहेत. त्यामुळे दिवाळखोरांच्या यादीत आपण बरेच पुढे असू हे नक्की.

अर्थशास्त्राच्या भाषेत जेव्हा तुमचे देणे तुमच्या मालमत्तेपेक्षा जास्त होते, तेव्हा तुम्ही दिवाळखोर घोषित होत असता. पाण्याचेही तसेच आहे. असे समजा की, आपण निसर्गाकडून दरवर्षी जे पाणी आपण पावसाच्या रूपात मिळवतो, तो आपला वार्षिक 'पगार' आहे. खरे तर पगारावर भागले पाहिजे. पण, पगारावर भागविण्याची रीतच राहिलेली नाही. गेल्या अनेक दशकांपासून आपण आपल्या 'फिक्स्ड डिपॉझिट'वर, म्हणजेच भूगर्भातील पाण्यावर आणि हिमनद्यांवर जगत आहोत. एकप्रकारे संचित ओरबाडतो आहोत. दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन शहराने काही वर्षांपूर्वी 'डे झीरो' (ज्या दिवशी नळाला पाणी येणार नाही) अनुभवला होता. आज भारतातील बंगळुरू हे जागतिक कीर्तीचे शहर त्याच मार्गावर आहे. एकेकाळी हजारो तलावांचे शहर असलेले बंगळुरू आयटी हब बनले आहे. पण तिथल्या भूजलाची पातळी फार खाली गेली आहे. शहरात राहणारे लाखो लोक आज पूर्णपणे खाजगी टँकर माफियांच्या दयेवर जगत आहेत. नागपुरातही एके काळी बरेच तलाव होते. ते बारा महिने भरलेले असायचे. आता त्या तलावांची दशा पाहावत नाही. मुंबई आणि दिल्लीची परिस्थिती फार वेगळी नाही. दिल्लीत यमुनेचा प्रवाह इतका प्रदूषित झाला आहे की, ते पाणी शुद्ध करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे राहिलेले नाही. दिल्लीच्या अनेक भागांत पाणी उपसा करण्यासाठी आता जमिनीला 'छिद्र' पाडण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. पण त्या छिद्रांतून आता पाणी काढणे जवळपास अशक्यप्राय आहे. मुंबईत पावसाचे प्रमाण जास्त असले तरी, त्या शहराचे काँक्रिटीकरण इतके प्रचंड झाले आहे की, पावसाचे किंवा अन्य मार्गांनी येणारे पाणी जमिनीत न मुरता थेट समुद्रात वाहून जाते. नजीकच्या भविष्यात भारतातील अर्धी लोकसंख्या भीषण पाणीटंचाईमुळे त्रस्त होणार आहे. त्यात असंख्य शहरे असतील, गावेही असतील. भारतात ७० ते ८० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते. उद्योगांसाठीही प्रचंड प्रमाणात पाणी वापरले जाते. औद्योगिक सांडपाण्याने आपल्या नद्यांचा सत्यानाश केला आहेच. हरित क्रांतीनंतर आपण अन्नधान्यात स्वयंपूर्ण झालो, पण त्या बदल्यात आपण भूगर्भातील पाण्याचे प्रचंड शोषण केले. पंजाब आणि हरयाणा, जे भारताचे अन्नछत्र मानले जातात, तिथे इतके पाणी वापरले गेले आहे की, तिथे आता वाळवंटीकरणाची लक्षणे दिसू लागली आहेत. महाराष्ट्रातील मराठवाडा प्रदेश हे याचे उत्तम उदाहरण आहे. या कमी पावसाच्या प्रदेशात 'ऊस' या नगदी पिकाची लागवड केली गेली. उसाला प्रचंड पाणी लागते. एक किलो साखरेसाठी सुमारे १५०० ते २००० लिटर पाणी लागते. उसाचे अर्थकारण मराठवाड्याच्या तोंडचे पाणी पळविणारे ठरले आहे, हे दरवर्षी दिसतेच. ऊस पिकवणाऱ्या इतर भागांमध्येही हीच परिस्थिती उद्भवणार आहे. आपले औद्योगिकीकरणाचे हव्यास आणि प्रगतीच्या कल्पना एवढ्या चुकीच्या ठरत आहेत की माणसं राहतील तर या साऱ्या गोष्टींना अर्थ असेल, एवढेही आपल्याला कळेनासे झाले आहे. उदाहरण घ्या पाणथळाच्या जमिनींचे. पाणथळाच्या जागा या निसर्गासाठी 'किडनी' म्हणून काम करतात. त्या ठिकाणी पाणी शुद्ध होते आणि साठवले जाते. भारताने गेल्या ३० वर्षांत आपल्या ३० टक्के पाणथळ जागा नामशेष केल्या आहेत. ठाण्याची खाडी असो किंवा कोलकात्याची, पूर्वीच्या काळची पाणथळ जमीन, नव्या काळात रिअल इस्टेटच्या नावाखाली काळाच्या ओघात दिसेनाशी झाली आहे. परिणामी, पावसाचे पाणी साठवण्याची निसर्गाची क्षमता कमी झाली आणि जल दिवाळखोरीचा वेग वाढला. नद्यांची पात्रे आपण संकुचित केली. रेतीच्या उपशाने जो कहर केला आहे, त्याला तर मानवी हव्यास आणि भ्रष्टाचाराचा हिमालयच म्हटले पाहिजे. दुसरीकडे हिमालयातील हिमनद्या वेगाने वितळत आहेत. त्या भागातील बर्फाचे साठे संपले तर उत्तर भारतातील तब्बल ६० कोटी लोकांचे अस्तित्व धोक्यात येईल. पावसाचे चक्रही बदलले आहे. आता पाऊस कमी दिवसांत पण प्रचंड वेगाने पडतो. त्यामुळे जमिनीला पाणी शोषून घेण्यास वेळच मिळत नाही. शहरे व गावांमध्ये काँक्रिटमुळे जमीन झाकली गेली आहे. झाडांच्या मुळांच्या भोवताली श्वास घ्यायला जमीन नाही. अशात जलस्रोत संपणार किंवा कमी होणार नाहीत तर दुसरे काय होणार? जलस्रोत कोरडे पडतात, तेव्हा गावेच्या गावे रिकामी होतात. देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो कुटुंबे कामाच्या शोधात मुंबई-पुण्याकडे येतात तेव्हा त्यात हेही एक कारण असते. त्यांच्यामुळे या शहरांच्या पायाभूत सुविधांवर ताण पडतो. दुर्दैव असे की, निसर्गाचाही मुद्दा या स्थलांतरात आहे, हे साफ विसरले जाते. फक्त राजकारणाचा तेवढा पाऊस पडत राहतो. आर्थिक दिवाळखोरीतून बाहेर पडण्यासाठी जसे 'बेलआऊट पॅकेज' किंवा कठोर शिस्त लागते, तसेच आपल्याला जल क्षेत्रासाठी करावे लागेल. प्रत्येक ग्रामपंचायत, नगर पालिका-पंचायत आणि महानगरपालिकेने आपले 'वॉटर बजेट' जाहीर केले पाहिजे. आपल्याकडे किती पाणी येते आणि आपण किती खर्च करतो, याचा दरमहा हिशेब जनतेसमोर सादर केला जायला हवा. उद्योगांना आणि मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांना 'वॉटर ऑडिट' अनिवार्य केले पाहिजे. इस्रायलने जगाला दाखवून दिले आहे की, पाण्याचा वापर आणि पुनर्वापर कसा करावा. तिथे ९० टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते शेतीसाठी वापरले जाते. भारतालाही प्रत्येक शहरात सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभे करावे लागतील. मुंबईतील समुद्रात सोडले जाणारे सांडपाणी जर प्रक्रिया करून उद्योगांना दिले, तर धरणांमधील पाणी पिण्यासाठी शिल्लक राहील. शेतकऱ्यांना कमी पाण्यावर पिकणाऱ्या पिकांकडे वळवण्यासाठी 'सबसिडी' दिली पाहिजे. ठिबक किंवा तुषार सिंचन अनिवार्य केले पाहिजे. 'सॅटेलाइट इमेजरी' आणि 'आयओटी' सेन्सर्सच्या मदतीने भूगर्भातील पाणी पातळीवर लक्ष ठेवले पाहिजे. कुठे अवैध उपसा होतोय, हे रिअल-टाईममध्ये कळल्यास कारवाई करणे सोपे होईल. अर्थात, हे फक्त सरकारचे काम नाही. व्यक्तिगत पातळीवर पाणीबचतीसाठी प्रयत्न करून सरकारवर पाणीचोरांवर कारवाई करण्याचा दबाव आणणे हे नागरिकांचेही कर्तव्य आहे. पृथ्वीच्या पोटात असलेल्या मर्यादित संसाधनांचा अमर्याद वापर करून मानवजात तग धरू शकणार नाही. पाणी ही विकत घेण्याची वस्तू नाही. ते जपून वापरण्यासाठीचे नैसर्गिक संचित आहे. आपण आपली जीवनशैली, आपली शेती आणि आपली धोरणे बदलली नाहीत, तर येणारा काळ आपले घसे कोरडे करणारा असेल आणि तो कोणत्याही महामारीपेक्षा कमी नसेल. जल दिवाळखोरीच्या इशाऱ्याचा अर्थ हाच!

## विशेष

प्रा. सुखदेव बखळे

# पायाभूत, गृहोद्योगामध्ये गुंतवणूक

भारत २०२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाची तयारी करत असताना उद्योग जगतातले धुरीण आणि धोरणतज्ज्ञ पुढील काही वर्षांमध्ये देशाच्या विकासाचा मार्ग निश्चित करू शकतील, अशा उपाययोजनांवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. अर्थसंकल्पात 'रिअल इस्टेट'पासून पायाभूत सुविधांपर्यंत आणि रस्त्यांपासून हरित खरेदीपर्यंत पायाभूत सुविधा, वित्तपुरवठा आणि शाश्वतता यावर लक्ष केंद्रित केले जाईल, अशी व्यापक अपेक्षा आहे. 'रिअल इस्टेट' क्षेत्र उपभोग-नेतृत्वाखालील वाढ, गुंतवणूकदारांचा विश्वास आणि निवासी तसेच व्यावसायिक बाजारपेठांमध्ये वित्तपुरवठ्याची उपलब्धता वाढवण्यासाठी उपाययोजनांची अपेक्षा करत आहे. हे क्षेत्र पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देणाऱ्या, मंजुरी सुलभ करणाऱ्या आणि वेळेवर प्रकल्प अंमलबजावणीला समर्थन देणाऱ्या उपक्रमांची अपेक्षा करत आहे. शहरी पायाभूत सुविधांमध्ये सतत गुंतवणूक करणे, बाजारपेठेतील गती टिकवून ठेवण्यासाठी आणि दीर्घकालीन विकास सक्षम करण्यासाठी महत्त्वाचे ठरेल. कार्यक्षम वित्तपुरवठा, मजबूत पायाभूत सुविधा आणि सुव्यवस्थित प्रक्रिया सुलभ करून, २०२६ चा अर्थसंकल्प प्रकल्प अंमलबजावणीत लक्षणीय वाढ करू शकतो. अधिक गुंतवणूक आकर्षित करू शकतो आणि संपूर्ण भारतात आधुनिक, शाश्वत शहरी वातावरणाच्या विकासाला चालना देऊ शकतो. विश्वासार्ह वित्तपुरवठा आणि मजबूत मागणी समर्थन सक्षम करणारी धोरणे या क्षेत्राची गती टिकवून ठेवण्यासाठी आणि शहरी विकासाची क्षमता उघड करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतील. जागतिक व्यापार अनिश्चितता आणि समष्टी आर्थिक अडचणी गुंतवणूक भावनांवर परिणाम करत असताना, अर्थसंकल्प एका महत्त्वाच्या टप्प्यावर येत आहे.

येत्या काळात बांधकाम क्षेत्रात वाढत्या खाजगी भांडवली खर्चामुळे निर्यातीच्या संधींमध्ये वाढ, संरक्षण अनुप्रयोग आणि विमानतळ, रेल्वे आणि मालवाहतूक कॉरिडॉरमध्ये शाश्वत गुंतवणूक होईल, अशी अपेक्षा आहे. खाजगी गुंतवणुकीत वाढ आणि उद्योगाचा विश्वास बळकट करण्यासाठी जीएसटीचे तरलीकरण, व्याजदर कमी करणे आणि सुधारित तरलता यासारखे धोरणात्मक उपाय आवश्यक आहेत. ते रस्ते आणि महामार्ग गतिशीलता, मालवाहतूक कार्यक्षमता आणि प्रादेशिक एकात्मतेसाठी महत्त्वपूर्ण आहेत. ते दीर्घकालीन हवामान उद्दिष्टांनाही समर्थन देतात. भारताने शाश्वत सार्वजनिक गुंतवणुकीद्वारे ६.५ दशलक्ष किलोमीटरचे विस्तृत रस्ते नेटवर्क तयार केले आहे, तरीही देखभाल प्रणाली जुन्या पद्धतींवर अवलंबून आहे. त्यात सुधारणा आवश्यक आहे. खर्च ऑप्टिमाईझ करण्यासाठी, सुरक्षितता आणि मालमत्तेचे आयुष्य वाढवण्यासाठी कामगिरी-आधारित देखभाल करारांसह 'एकत्रित डिजिटल रोड असेट मॅनेजमेंट सिस्टिम' (रॅम्स) स्वीकारण्याची आवश्यकता आहे. कमीत कमी खर्चात कमी-कार्बन सामग्रीचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी 'एमओआरटीएच', रेल्वे आणि 'सीपीडब्ल्यूडी' यासारख्या प्रमुख सरकारी संस्थांमध्ये हरित सार्वजनिक खरेदी संस्थात्मक करण्याची गरज आहे. यातून शाश्वत पायाभूत सुविधांच्या विकासासाठी एक व्यावहारिक मार्ग तयार होईल आणि भारताच्या डिकार्बोनायझेशन मोहिमेला पाठिंबा मिळेल.

देशाचा अर्थसंकल्प गुंतवणूक, कार्यक्षमता आणि लवचीकतेसाठी उत्प्रेरक म्हणून काम करू शकतो. येत्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा क्षेत्राला सर्वाधिक महत्त्व असेल. ग्रामीण पायाभूत सुविधांकडे विशेष लक्ष दिले जाईल. अर्थसंकल्पात याबद्दल काही घोषणा केल्या जाऊ शकतात. रखडलेले मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी काही योजना जाहीर होण्याची शक्यता आहे. या श्रेणीमध्ये १८ योजना असून जुलै २०२४ मध्ये शेवटच्या अर्थसंकल्पीय घोषणेपासून त्यामध्ये सरासरी १०.८९ टक्क्यांनी घट झाली आहे. पायाभूत सुविधा आणि भांडवली वस्तू क्षेत्रातील चांगल्या कंपन्यांमध्ये पोर्टफोलिओचा योग्य भाग गुंतवून, संभाव्य नफ्याचा फायदा घेता येतो. जोखीम कमी करण्यासाठी, हळूहळू गुंतवणूक करण्याची रणनीती स्वीकारता येईल. या अर्थसंकल्पात ऊर्जा, रेल्वे आणि संरक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले जाऊ शकते. याशिवाय प्रशासन सुधारणे, कर्जाचे पुनर्गठन करणे आणि हरित ऊर्जेकडे वाटचाल करणे यासारखी पावलेदेखील उचलली जाऊ शकतात. या श्रेणीमध्ये सुमारे सहा फंड आहेत, जे जुलै २०२४ मध्ये शेवटच्या अर्थसंकल्पीय घोषणेपासून सरासरी १५.५८ टक्क्यांनी कमी झाले आहेत. या अर्थसंकल्पात सरकारचे लक्ष जास्त खर्च (भांडवल खर्च) करण्याऐवजी वापर वाढवण्यावर असेल. शिवाय गेल्या दहा वर्षांमध्ये भारताचा संरक्षण खर्च जागतिक सरासरीपेक्षा खूप वेगाने वाढला आहे.

सरकारी खर्चात वाढ आणि धोरणात्मक उपक्रमांमुळे संरक्षण क्षेत्रासाठी दीर्घकालीन दृष्टिकोन सकारात्मक आहे. जगातील वाढत्या तणावामुळे आणि भारताच्या स्वावलंबी होण्याच्या प्रयत्नांमुळे देशांतर्गत संरक्षण कंपन्यांच्या ऑर्डर आणि महसुलामध्ये वाढ होत आहे. भारतातील रिअल इस्टेट क्षेत्र एका वळणावर आहे. परवडणाऱ्या घरांची पुनर्प्राप्ती होते की ही गरज पुन्हा दुर्लक्षित होते, हे २०२६ चा केंद्रीय अर्थसंकल्प ठरवेल. लक्झरी प्रकल्पांची भरभराट होत आहे आणि त्यांची विक्री चांगली होत आहे; परंतु परवडणाऱ्या घरांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. वाढत्या किमती आणि कमी नफ्यामुळे विकासक बजेट प्रकल्पांपासून दूर जात आहेत. हे क्षेत्र आता तातडीने धोरणात्मक बदलांसाठी बजेटकडे पाहात आहे. लक्झरी आणि परवडणाऱ्या घरांमधील तफावत चिंताजनक बनली आहे. प्रीमियम घरे भरपूर खरेदीदार आणि गुंतवणूक आकर्षित करतात. मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी मात्र परवडणारी घरे कमी होत चालली आहेत. विकासक म्हणतात, की जमिनीच्या किमती खूप जास्त आहेत. बांधकाम खर्च वाढतच आहे. बजेट प्रकल्पांवरील नफा खूप कमी आहे. म्हणून ते परवडणारी घरे बांधणे पूर्णपणे थांबवतात. तरुण कुटुंबे आता घरे घेऊ शकत नाहीत. बँका जास्त व्याजदर आकारतात. त्यापोटी करावयाच्या मासिक खर्चामुळे घरांच्या उत्पन्नावर खूप तणाव येतो. अनेक लोकांना घरे खरेदी करण्यास उशीर करावा लागतो, तर काही जण असे स्वप्न पूर्णपणे सोडून देतात. यामुळे भारताच्या शहरी विकास योजनांना धक्का बसतो.

परवडणाऱ्या घरांचा अर्थ ४५ लाख रुपयांपेक्षा कमी किमतीची घरे; पण ही किंमत मर्यादा आता मोठ्या शहरांमध्ये काम करत नाही. जमीन आणि बांधकाम खर्च या मर्यादेपेक्षा खूपच वाढला आहे. मुंबई, दिल्ली आणि बंगळुरूमध्ये अगदी मूलभूत घरांची किंमतही खूप जास्त आहे. सरकारची परवडणाऱ्या घरांची व्याख्या आता अवास्तव आणि जुनी झाली आहे. उद्योगक्षेत्रातील धुरीणांच्या मते या व्याख्येमध्ये संपूर्ण सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. शहरांनी स्थानिक खर्चाच्या आधारावर स्वतःची किंमत मर्यादा निश्चित करावी.

आणखी एक बाब म्हणजे उद्योग जीएसटीचे सुसूत्रीकरण करू इच्छितो. बांधकाम सुरू असलेल्या घरांवरील सध्याचा जीएसटी खूप जास्त आहे. तो कमी केल्याने खर्च कमी होईल. गृहकर्जांवरील उत्पन्न कपात मर्यादा वाढल्यानेही मदत होईल. 'रिअल इस्टेट'ला उद्योगाचा दर्जा देणे हे परिवर्तनकारी ठरेल. त्यामुळे चांगल्या निधी स्रोतांना प्रवेश मिळेल. बँका विकासकांना अधिक सहजपणे कर्ज देऊ शकतील. जोखीम मूल्यांकन अधिक अचूक होईल. या दर्जामुळे 'रिअल इस्टेट'ला दीर्घकालीन, भांडवल-केंद्रित क्षेत्र म्हणून कायदेशीर मान्यता मिळेल. शहरांना चांगले रस्ते, मेट्रो सिस्टिम आणि उपयुक्तता आवश्यक आहेत. पायाभूत सुविधांमध्ये होणारी गुंतवणूक रोजगार निर्माण करते आणि लोकांना आकर्षित करते. त्यामुळे घरांसाठी नवीन क्षेत्रे इष्ट बनतात. पायाभूत सुविधांशिवाय परवडणारी घरेदेखील विकली जाणार नाहीत. 'रिअल इस्टेट' क्षेत्राचा विश्वास आहे, की २०२६ चा अर्थसंकल्प हा एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

गिरीश शेरेकर

# राष्ट्रसंतांचे पाईक जनार्दनपंत बोथे गुरुजी

अमरावती जिल्ह्यातल्या तिवसा तालुक्यातील गुरुकुंज मोझरी येथील अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दनपंत बोथे गुरुजी यांना केंद्र सरकारने प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्मश्री पुरस्कार जाहीर केला. त्यांना मिळालेला हा पुरस्कार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा आणि कार्याचा गौरव आहे. बोथे गुरुजी विद्यार्थिदशेपासूनच राष्ट्रसंतांच्या कार्याचे आणि विचारांचे पाईक आहेत. त्यांचा जन्म २५ नोव्हेंबर १९३९ रोजी गोगरी, ता. मंगरूळपीर, जि. वाशीम येथे झाला. १४ जुलै १९५४ पासून ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांकडे आले. पुढे ते राष्ट्रसंतांच्या सहवासातच राहिले. त्यांचे खाजगी सचिव म्हणून कार्यरत होते. राष्ट्रसंतांसोबत त्यांनी देशभर प्रवास केला. त्यांच्या आजारपणात त्यांची सेवा केली. विविध पदे त्यांनी भूषविली. आपल्या जीवनातील पाच दशकांहून अधिक काळ समाज उद्धारासाठी त्यांनी वाहिला. शिक्षण, ग्रामीण विकास, आध्यात्मिक प्रचार आणि मानवसेवा हे त्यांचे प्रमुख कार्य आहे. अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज आश्रम (स्थापना १९४२, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज) यांचे प्रमुख सचिव म्हणून त्यांनी आध्यात्मिक मूल्यांना समाजातील मूळ पातळीवर परिवर्तनकारी कृतीत रूपांतरित केले आहे. दलित, आदिवासी आणि वंचित घटकांसाठी शिक्षणाची तातडीची गरज ओळखून, त्यांनी १९७२ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शिक्षण संस्था स्थापन केली. या उपक्रमांतर्गत त्यांनी आदिवासी व दुर्गम भागांमध्ये ११ निवासी शाळा व वसतिगृहे सुरू करून हजारो विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले. ग्रामीण भागात त्यांनी योगाचा प्रसार केला. त्यांचे नेतृत्व केवळ पुस्तकी शिक्षणापुरते मर्यादित न राहता शिस्त, मूल्य, आणि नेतृत्व गुणांचाही संस्कार करणारे ठरले. बोथे गुरुजी हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या वारशाचे निष्ठावान संवाहक आहेत.



त्यांनी राज्यस्तरीय साहित्य संमेलने आयोजित केली, दुर्मिळ छायाचित्रे व दस्तावेजांचे संग्रहालय तयार केले आणि ग्रामगीतेच्या प्रती समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविल्या, जेणेकरून महाराजांचे आध्यात्मिक व तात्त्विक विचार सर्वदूर प्रसारित होतील. त्यांचे आरोग्य उपक्रमही तितकेच प्रभावी ठरले आहेत. गुरुदेव आयुर्वेदिक रुग्णालयात नियमित रक्तदान शिबिरे, स्वच्छता मोहीम व आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. राष्ट्रीय एकात्मता सप्ताहासारख्या उपक्रमांद्वारे त्यांनी शेकडो गावांना एकत्रित कृतीसाठी प्रेरित केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आज १० हजारांहून अधिक ग्रामीण शाखा व ८५० महिला मंडळे योग शिबिरे, भजन कार्यक्रम, व्यसनमुक्ती मोहिमा व महिला सक्षमीकरण कार्यक्रम आयोजित करतात. श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस (प्रशासक) म्हणून त्यांनी गुरुकुंज आश्रमाचे आधुनिकीकरण करताना त्याच्या आध्यात्मिक मूळ स्वरूपास जपले. शासनाच्या दलित मित्र व आदिवासी सेवा संस्था पुरस्कारासह विविध राज्य व राष्ट्रीय पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. आता त्यांना देशाचा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार राष्ट्रसंतांच्या कार्याचा गौरव असल्याचे त्यांनी नम्रपणे सांगितले. त्यांचे खूप अभिनंदन!

**अमरावती जिल्हा आठ पद्म रत्नांचा :** अमरावती जिल्हा आता आठ पद्म पुरस्कार्थींचा झाला आहे. जिल्ह्याला पहिला पद्मश्री पुरस्कार डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांना १९५९ साली कुष्ठरोग निवारण आणि सामाजिक कार्यातील योगदानासाठी देण्यात आला. १९७१ साली बॅ. रामराव देशमुख यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. ब्रिटिश सरकारच्या काळात त्यांनी विविध पदे भूषविली होती. दोनवेळा ते राज्यसभेचे सदस्य होते. त्यानंतर थेट २०१२ मध्ये श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव प्रभाकरराव वैद्य यांना क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी, २०१६ साली 'झीरो बजेट' संकल्पनेवरच्या नैसर्गिक शेतीचे पुरस्कर्ते सुभाष पाळेकर, मेळघाटातील बैरागढ येथून आदिवासी बांधवांसाठी सामाजिक कार्य करणाऱ्या डॉ. रवींद्र व डॉ. स्मिता कोल्हे या दाम्पत्याला २०१९ मध्ये, परतवाडा जवळच्या वझ्झर येथील स्व. अंबादापंत वैद्य बालगृहाचे संचालक, अनाथांचे नाथ शंकरबाबा पापळकर यांना अनाथ मतिमंदांच्या संगोपनासाठी २०२४ साली आणि यंदा जनार्दनपंत बोथे यांना पद्मश्री पुरस्कार मिळाला आहे. पहिल्या महिला राष्ट्रपती, सरन्यायाधीश व राज्यपालाचा आणि आतापर्यंत प्राप्त आठ पद्म पुरस्कारांचा मान अमरावतीला मिळाला आहे. देशपातळीवर अमरावतीच्या विभूतींचे योगदान त्यातून अधोरेखित झाले आहे आणि पुढेही होत राहील.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# नारद पुराण

देवर्षी नारदांच्या नावाने हे पुराण असले तरी या पुराणात देवर्षी नारद श्रोत्याच्या भूमिकेत असून पुराण प्रवक्ते सनकादी मुनी आहेत. नारदांनी प्रश्न आणि शंका विचारून सनतकुमारादी चार बंधूंना बोलके केले म्हणून हे नारद पुराण.

हे पुराण ज्योतिषज्ञ, गणितज्ञ, वैयाकरणी, वास्तू विशारदांनी जरूर वाचले पाहिजे. अनेक बाबी प्रकाशात येऊ शकतात. पाश्चिमात्यांच्या नावावर चालणारे अनेक सिद्धांत आणि प्रमेय त्यांनी नारद पुराणातून अक्षरशः चोरले असावेत हे स्पष्ट दिसते. हे पुराण ब्रह्मदेवाचे चार पुत्र सनक, सनंदन, सनातन आणि सनतकुमार यांनी देवर्षी नारदांना दिलेला उपदेश आहे. देवर्षी नारद देखील ब्रह्मपुत्र आहेत. त्यामुळे मोठ्या भावांनी लहान भावाला सांगितलेले भक्तिशास्त्र म्हणजे नारद पुराण आहे.

नारद पुराण, नावावरूनच लक्षात येते की ही नारदांनी उकल केलेली अमृतवाणी आहे. देवर्षी नारद आणि नारायण नारायण हा नामजप हे घट्ट सूत्र सर्वांना ज्ञात आहे. त्यामुळे साहजिकच हे वैष्णव पुराण असून यात भगवान विष्णूंचे गुणगान आहे. उपलब्ध प्रतीनुसार या पुराणाचे दोन भाग असून, पूर्वभागाचे एकूण ४ भाग केले आहेत त्यांना ४ पाद म्हटले आहे. उत्तर भागातही अनेक कथा आणि माहात्म्य आहे.

प्रारंभीच नारदांनी सनतकुमारादीकांना विष्णुभक्तीचे माहात्म्य विचारले तेव्हा त्यांनी सुरुवातीला ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या ब्रह्मांडाच्या उत्पत्ती बाबत सांगितले. त्यानंतर विष्णुभक्तीचे फळ म्हणून मृकुंडू महामुनींची कथा आणि विष्णुकृपेने त्यांना झालेला पुत्र मार्कंडेय याची कथा विशद करतात. त्यानंतर सनकादी ऋषी नारदांना सगर राजाची कथा, भगिरथ राजाची कथा, गंगेचे भूतलावर अवतरण सांगितले. जीव अविद्येच्या बंधनातून कसा मुक्त होतो? नारदांच्या या प्रश्नांचे उत्तर देताना जनक राजा आणि आचार्य पंचशिख आणि भरत राजा पुढे जडभरत यांचा कथाभाग सांगतात.

शुकदेवांची कथा, ग्रहशांति प्रयोग, ॐ नमो नारायणाय अष्टाक्षर मंत्र, ॐ नमो भगवते वासुदेवाय हा द्वादशाक्षर मंत्र, श्रीरामपंचायतन मंत्र विधी, श्रीकृष्ण मंत्र विधी, युगुलशरणागती मंत्र, युगुल सहस्रनाम या पुराणात आहेत. श्री. गणपती स्तोत्र, दत्तात्रेय स्तोत्रासारखी अनेक स्तोत्रे इथे सापडतात. बौद्ध कल्की अवतारासह



विविध पुराणांचा परिचय, विविध व्रत माहात्म्य, बारा मासाच्या विविध तिथी माहात्म्य इथे विदित आहेत. विवाहाचे आठ प्रकार, चार वर्ण आश्रम, परा आणि अपरा विद्या, उत्तम लोक प्राप्ती याबाबत चर्चा आहे. काशी, प्रयाग, कुरुक्षेत्र, पुष्कर, अवंतिका माहात्म्य शिवाय गया श्राद्धाचे महत्त्व, श्राद्ध प्रयोगात विविध तिथी प्रयोग नारद पुराणात आहेत. पुरुषोत्तम क्षेत्र, कामाक्ष्या, प्रभास क्षेत्र, पंचवटी, गौतमी तटीचे त्र्यंबक, गोकर्ण, मथुरा, वृंदावन, रामेश्वर क्षेत्राचे माहात्म्य या पुराणात आहे.

या पुराणातील पूर्वभागातील द्वितीय पाद अभ्यासनीय, सर्जन आणि सृजनासाठी महत्त्वपूर्ण आहे. द्वितीय पादात वेदांचे सहा अंग दिले आहेत.

१) शिक्षा : यामध्ये मुख्यतः उच्चारण शास्त्र, सारेगमप हे स्वर, स्वराघात, विविध राग, ४९ तान, २१ मूर्च्छना इत्यादीबाबत विचार आहेत. हे वेदांगातील नाक आहे.

२) कल्प : नक्षत्र कल्प, वेद कल्प, संहिता कल्प, अंगिरस कल्प आणि शांति कल्प असे पंच कल्प आणि विधिशास्त्र आहे. हे वेदांगातील हात आहेत.

३) व्याकरण : यामध्ये शब्दांचे रूप, शब्दांच्या शक्ती, शब्दांच्या सिद्धी तथा व्युत्पत्ती, विभक्ती दिल्या आहेत. पाणिनी, व्याडी अशा वैयाकरणींनी नारद पुराण अभ्यासले असावे. हे वेदाचे मुख आहे.

४) निरुक्त : यामध्ये शब्दांचे अर्थ, व्युत्पत्ती अर्थात शब्दांचे योगिक स्वरूप आणि योगारूढ स्वरूपाचा विचार आहे. हे वेदाचे कान आहेत.

५) ज्योतिष : यामध्ये गणितीय सिद्धांत, ग्रह, नक्षत्र, फल, ग्रहांची गती, संक्रमण याबाबत चर्चा आहे. खरं म्हणजे ज्योतिष शास्त्र वेगळे चार लाख श्लोकांचे आहे. त्याचे तीन स्कंदात विभाजन नारद पुराणात दिले आहे. गणित, जातक आणि संहिता. हे वेदाचे डोळे आहेत.

६) छंद - यामध्ये लौकिक आणि अलौकिक छंदाचे वर्णन आहे. छंदांना वेदांचे चरण म्हणतात. ज्ञानेश्वर माउलींनी ज्ञानेश्वरीत सर्व छंदांचा वापर केला आहे तो याच पुराणातील असावा. छंद वेदांगातील पाय आहेत.

वास्तू, ज्योतिष आणि गणित अभ्यासकांसाठी नारद पुराण पर्वणी आहे. ज्याला आपण पायथागोरसचे प्रमेय म्हणतो ते त्याचे नसून त्याने ते नारद पुराणातून चोरले आहे. परीघ, व्यास, त्रिज्या अशी भूमितीय संज्ञा आणि प्रमेय याच पुराणातील आहेत.

बीजगणितातील वर्ग, वर्गमूळ या संकल्पना या पुराणात आहेत.

**समांकघातो वर्गः स्यात् तमेवाहुः कृतिं बुधाः।**
**अन्त्यात्तु विषमात्त्यक्त्वा कृतिं मूलं न्यसेत्पृथक् ॥**
**द्विगुणेनामुना भक्ते फलं मूले न्यसेत् क्रमात्।**
**तत्कृतिं च त्यजेद्विप्र मूलेन विभजेत् पुनः ॥१७॥**
**एवं मुहुर्वर्गमूलं जायते च मुनीश्वर।**

एखाद्या संख्येचा वर्ग काढणे आणि वर्गमूळ काढणे याची सोपी पद्धत या पुराणात दिली आहे.

वास्तूपुरुषाचे वर्णनही या पुराणात दिले आहे.

**वास्तुपुरुष नमस्तेऽस्तु भूशय्यानिरत प्रभो।**
**मद्गृहं धनधान्यादिसमृद्धं कुरू सर्वदा॥**

सनकादीक मुनिजनांनी देवर्षी नारदांना या पुराणाच्या माध्यमातून भगवान विष्णूंचा कृपाप्रसाद प्राप्त होण्यासाठी सोपा उपासना मार्ग सांगितला आहे. मोक्षप्राप्तीसाठी काय केले पाहिजे तो मार्गसोपान विशद केला आहे. विष्णुभक्तीचे लाभ कोणते यावर चिंतन केले आहे. याशिवाय गोहत्या, मदिरापान, मांसभक्षण, परस्त्रीप्रति दुर्भावना, चोरी ही पापे असल्याबाबत आणि त्याची शिक्षा आणि प्रायश्चित्त यावरही मार्गदर्शन दिले आहे.

नारद पुराण हे समाजशास्त्र आणि भक्तिशास्त्राचा अनोखा संगम आहे. सकाम उपासनेकडून निष्काम उपासनेकडे नेणारा शास्त्रीय विचार म्हणजे नारद पुराण होय.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### भारताचे भविष्य तरुणांच्या हातात

शेकडो वर्षांच्या गुलामीतून मुक्त होऊन भारताने प्रजासत्ताक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. प्रजासत्ताक दिन हा केवळ ध्वजारोहण आणि समारंभांचा दिवस नसून, आपल्या हक्कांबरोबरच कर्तव्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. आज देश उद्योग, तंत्रज्ञान, शेती, आरोग्य आणि डिजिटल क्षेत्रात वेगाने प्रगती करत आहे, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. मात्र ही प्रगती केवळ भौतिक पातळीवरच मर्यादित राहिली, तर ती टिकाऊ ठरणार नाही. आज साधने वाढत असताना संयम, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारी याकडे दुर्लक्ष होताना दिसते. केवळ भोगाची तृष्णा वाढली आणि सद्गुणांचा विकास झाला नाही, तर उन्नतीचा खरा अर्थच हरवतो.

भारतीय संस्कृतीने नेहमीच संयम आणि परमार्थ यांचे महत्त्व सांगितले आहे. वाढलेली शक्ती, ज्ञान आणि सुविधा यांचा योग्य वापर आत्मसंयमामुळेच शक्य होतो. मनुष्य हा समाजाचा ऋणी आहे; समाजासाठी आपले कर्तव्य पार न पाडणे म्हणजे कर्तव्याकडे दुर्लक्ष होय. राष्ट्राच्या समृद्धीसाठी आर्थिक उन्नती आवश्यक आहेच; पण चरित्र विकास त्याहून अधिक महत्त्वाचा आहे. चरित्र बळकट नसेल, तर कोणतीही भौतिक यशस्विता टिकून राहत नाही. आजच्या तरुणांसमोर एक मोठे आव्हान आहे. केवळ यशस्वी नागरिक बनणे नव्हे, तर सुसंस्कृत, जबाबदार आणि राष्ट्रासाठी विचार करणारे नागरिक बनणे. भारताचे भविष्य तरुणांच्या चारित्र्याच्या बळावरच घडणार आहे. आज प्रत्येक तरुणाने हे लक्षात ठेवले पाहिजे की भारताचे भविष्य तरुणांच्या हातात आहे केवळ अधिकारांची अपेक्षा न ठेवता कर्तव्य शिस्त संयम आणि राष्ट्रनिष्ठा जोपासली तरच भारत खऱ्या अर्थाने बलवान आणि गौरवशाली बनेल.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

### आयसीसीचा खंबीरपणा स्वागतार्ह

बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडची निवड, ही बातमी वाचली. हे होणारच होते. आयसीसी बरोबर केलेल्या कराराचे उल्लंघन करून बांगलादेशाने भारतात खेळण्यास ऐनवेळी नकार दिला आणि त्याचा परिणाम बांगलादेशाला भोगावा लागला. मात्र पाकिस्तानबाबत असा कोणताही वाद नसतानाही पाकिस्तानलाही आता खुमखुमी आली आहे असे वाचण्यात आले. बांगलादेशवर झालेल्या अन्यायाचे निमित्त साधून पाकिस्तान आपले महत्त्व वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहे आणि वर्ल्ड कप सामन्यांवर बहिष्कार घालण्याची पोकळ धमकी देत आहे. आयसीसी बरोबर केलेल्या कराराचे उल्लंघन केल्यास पाकिस्तानलाही गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. मात्र ते करण्यापूर्वी पाकिस्तानने त्यांच्या रमीज राजा या खेळाडूशी चर्चा जरूर करावी. आयसीसीचे ऐंशी टक्के उत्पन्न एकट्या बीसीसीआयकडून येत असल्याने, जर भारताने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या बाबतीत हात आखडता घेतला तर, पाकिस्तानी खेळाडूंकरिता बूट खरेदी करण्यासाठी सुद्धा पाकिस्तानी क्रिकेट मंडळाला इतर देशांकडे कटोरा घेऊन फिरावे लागेल, अशी स्पष्टोक्ती रमीज राजाने नुकतीच केली होती. तेव्हा आपले उपद्रवमूल्य वाढवण्याचा प्रयत्न करणे पाकिस्तानसाठी आत्मघातकी ठरू शकतो. आयसीसीच्या खंबीरपणाबाबत त्यांचे अभिनंदन.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### न्यूझीलंडवर भारताचा शानदार विजय

गुवाहाटी येथे गोलंदाजांच्या प्रभावी कामगिरीनंतर अभिषेक शर्मा आणि कर्णधार सूर्यकुमार यादवच्या दमदार फलंदाजीच्या बळावर भारताने येथे तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात पाहुण्या न्यूझीलंडवर १० षटके शिल्लक ठेवीत ८ गड्यांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयाबरोबरच भारताने ५ सामन्यातील टी-२० मालिका ३-० ने खिशात घातली आणि आगामी टी-२० विश्वचषकासाठी सज्जा असल्याचे दाखवून दिले. जसप्रीत बुमराह सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. भारताने दहा षटकांत २ बाद १५५ धावा केल्या. अभिषेक शर्माने अवघ्या २० चेंडूत ७ चौकार व ५ षटकारांच्या मदतीने नाबाद ६८ धावांची तर कर्णधार सूर्यकुमारने २६ चेंडूत ६ चौकार व ३ षटकारांच्या मदतीने नाबाद ५७ धावांची विजयी खेळी केली. अभिषेकने अवघ्या १४ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. सामन्यातील भारतीय फलंदाजांची अप्रतिम फलंदाजी पाहून प्रत्येक भारतीय क्रिकेटप्रेमीला अतिशय आनंद व अभिमान वाटला असेल, यात शंका नाही. कर्णधार सूर्यकुमारने कर्णधाराला शोभेल अशाच प्रकारची कामगिरी केलेली आहे आणि कर्णधाराकडून हीच अपेक्षा आपली असते. जसप्रीत बुमराहची गोलंदाजी, ईशान किशन, अभिषेक शर्मा व सूर्यकुमारची फलंदाजी अप्रतिम होती. भारतीय संघाचा खेळ पाहता ७ फेब्रुवारीपासून सुरू होणारा टी-२० विश्वचषक जिंकण्याची भारताची पूर्ण तयारी आहे, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने जिल्ह्यात शोककळा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ जानेवारी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात बुधवारी निधन झाले. एक उमदे नेतृत्व कुशल प्रशासक शिस्तप्रिय नेता म्हणून ज्यांची ओळख होती असे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांचे निधन झाल्याची बातमी अत्यंत दुःखदायक असून देशातील तरुण पिढी फळीतील एक उत्तम नेता गमावला आहे.

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे आल्यापासून बीडच्या विकासाला वेगळी दिशा मिळाली होती. बीड नगर परिषदमध्ये अजित पवारांच्या शब्दावर परिवर्तन झाले. त्या परिवर्तनाचा भाग म्हणून बीड शहरातील रस्त्यासाठी अजित पवारांनी २२ कोटी रूपये निधी तात्काळ दिला. अजित पवारांच्या या धडाकेबाज कामगिरीमुळे



बीडकरांनी विश्वास ठेवून स्थानिक स्वराज्य संस्था असलेली नगर परिषद अजित पवारांच्या ताब्यात दिली. बीडला विकासाचे स्वप्न पडू लागले.पवार विकास करणारच हा ठाम विश्वास बीडकरांच्या मनामध्ये जागृत झाला होता. मात्र बीडच्या नशिबी दुर्भाग्यच आहे की काय ? असा प्रश्न पडतो. अजित पवारांना बीडकरांना भरघोस निधी देणार, कधी नव्हे एवढा बीडकरांचा विकास होणार हे बीडकरांचे स्वप्न अजित पवारांच्या निधनामुळे भंगले आहे. बीड जिल्ह्यातील दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनीही केंद्र सरकारमध्ये मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर बीड जिल्ह्याला मोठा निधी मिळेल हाही अपेक्षा भंग झाला. तर बीडच्या मातीतील दिवंगत नेते प्रमोद महाजन यांचेही निधन झाले. यावरून बीडकरांना आता भिती वाटत आहे. बीडचा विकास करणाऱ्या नेत्याला नियतही हिरावून नेते की काय तशी अजित पवारांच्या अकाली निधनामुळे बीडकर यांचे विकासाचे स्वप्न भंगले आहे हे मात्र निश्चित आहे. राज्यासह जिल्ह्यामध्ये अजित पवारांच्या निधनामुळे शोककळा पसरली असून अजित पवारांचे बीड जिल्ह्यातील जनतेचे पालकमंत्री या नात्याने जिव्हाळा निर्माण झाला होता. पण नियतीने धडाकेबाज काम करणारा नेताच हिरावून नेल्याचे दुःख आणि शल्य बीडकरांच्या मनात कायम राहिल.

# लोकनेते अजितदादांच्या निधनाने बीड जिल्हा विकासाचे स्वप्न भंगले-जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ जानेवारी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते मा. अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्रभर शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक विकासाचा साधक, परखड व प्रामाणिक लोकनेता गमावला आहे. तर बीड जिल्ह्याचे विकासाचे स्वप्न भंगले असुन अपरीमीत नुकसान झाले आहे. या दुर्दैवी घटनेबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष मा. राजेंद्र मस्के यांनी तीव्र शोक व्यक्त करून श्रद्धांजली अर्पण केली.

राजेंद्र मस्के म्हणाले - अजितदादा पवार हे विकासाच्या आकांक्षा घेऊन महाराष्ट्र समृद्धीची भरारी घेणारे नेता होते. त्यांनी प्रशासनात कार्यतत्परता, निर्णयक्षमता आणि लोकसंपर्काचा अद्वितीय संगम साधला. त्यांच्या कामाचा ठसा प्रत्येक क्षेत्रात उमटला आहे. अजितदादांनी आपल्या कारकिर्दीत सिंचन, ऊर्जा, शिक्षण, उद्योग, ग्रामीण विकास व प्रशासनातील पारदर्शकता यासाठी अविस्मरणीय कार्य केले.त्यांच्या गण, प्रामाणिकपणा आणि परखड नेतृत्वामुळे महाराष्ट्रात विकासाचा नवा अध्याय लिहिला गेला. त्यांच्या व्यक्तिमत्वात जनते बद्दलची आत्मीयता, प्रखर नेतृत्वगुण आणि शिस्तबद्ध कार्यशैली होती. निर्णय घेण्याची ताकद आणि जनहिताची बांधिलकी हीच त्यांची खरी ओळख होती. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राचे एक स्थिर व सक्षम नेतृत्व हरपले आहे, बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारल्या पासून जनतेच्या विकासा बाबत आशा पल्लवित झाल्या होत्या. विकासाचा अनुशेष भरून निघेल.जिल्हा प्रगतीच्य मुख्य प्रवाहात येईल. स्वप्नन साकारण्या पुर्वी नियतीनं घाला घातला. खऱ्या अर्थाने पुन्हा एकदा बीड जिल्ह्याच्या वाट्याला दुर्दैव आले आहे.राज्याच्या विकासयात्रेला गती देणाऱ्या या द्रष्ट्या नेत्याचे कार्य जनतेच्या स्मरणात सदैव जिवंत राहील.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, बीड जिल्हा परिवाराकडून विकासाचा साधक, परखड व प्रामाणिक लोकनेता अजितदादा पवार यांना विनम्र श्रद्धांजली.

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ जानेवारी**

ग्रामीण भागातील शेतीपूरक पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात ऐतिहासिक स्वरूपाची कार्यवाही सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या धोरणात्मक निर्णय व मार्गदर्शनातून शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यासाठी अतिक्रमणमुक्त शिवार आणि सक्षम दळणवळण या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या योजनेच्या माध्यमातून आज बीड जिल्ह्यात एकाच दिवशी तब्बल ५६ शेत / पाणंद रस्ते खुले करण्यात आले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः प्रत्यक्ष विविध ठिकाणी उपस्थित राहून रस्ता खुला करण्याची कार्यवाही सुरू केली . प्रशासनाने केवळ आदेशापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष शेतकऱ्यांमध्ये जाऊन काम केल्याने ग्रामीण भागात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

केज तालुक्यात टाकळी येथे शिव रस्त्याच्या मजबुतीकरणास सुरुवात - मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेअंतर्गत केज तालुक्यातील टाकळी येथे केज-टाकळी शिव रस्त्याच्या अतिक्रमण हटवून रस्ता मजबुतीकरण कामकाजास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. हा शिव रस्ता सुमारे ३ किलोमीटर लांबीचा असून चिंचोली माळी येथील राज्यमार्ग ते टाकळी येथील राष्ट्रीय महामार्ग यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अतिक्रमणामुळे अरुंद झालेल्या या रस्त्यावरून शेतीमाल वाहतूक करताना शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अतिक्रमण हटवून ३३ फूट रुंदीने रस्ता मजबुतीकरणास सुरुवात करण्यात आल्याने सुमारे २५०० शेतकऱ्यांना थेट लाभ होणार आहे. शेतीमाल वाहतूक , मशागत , बाजारपेठेपर्यंत पोहोच तसेच आपत्कालीन सेवा अधिक सुलभ होणार आहेत. या वेळी उपविभागीय अधिकारी दीपक वांजळे , अंबाजोगाईचे तहसीलदार



## मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना : बीड जिल्ह्यात विकासाचा नवा मार्ग मोकळा , एकाच दिवशी ५६ पानंद रस्ते खुले ; केज तालुक्यात टाकळी शिव रस्त्याच्या मजबुतीकरणास प्रारंभ , तर राजुरी ( न ) मंडळातील मुर्शदपूर - तिप्पटवाडी येथे अतिक्रमणमुक्त पाणंद रस्ता खुला

विलास तरंगे , मंडळ अधिकारी तसेच विविध महसूल विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्व लगत शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन रस्ता होत असल्याने ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी , उपविभागीय अधिकारी आणि संपूर्ण महसूल प्रशासनाचे आभार मानले.

राजुरी ( न ) मंडळातील मुर्शदपूर - तिप्पटवाडी येथे अतिक्रमणमुक्त पाणंद रस्ता खुला - याच दिवशी मंडळ विभाग राजुरी ( न ) , तालुका व जिल्हा बीड अंतर्गत मुर्शदपूर आणि तिप्पटवाडी येथे मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेअंतर्गत आणखी एक महत्त्वपूर्ण कार्यवाही यशस्वीपणे पार पडली.

अर्जदार अजिनाथ रोडे आणि इतर शेतकऱ्यांनी सादर केलेल्या अर्जानुसार गट क्रमांक १५१ , ७५ आणि ७७ मधील वंजारवाडी तलावाच्या कॅनॉललगतचा चारी रस्ता हा अनेक वर्षांपासून अतिक्रमणामुळे पूर्णपणे बंद अवस्थेत होता. या रस्त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतीपर्यंत पोहोचताना मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. या प्रकरणात मंडळ अधिकारी प्रभू येवले , ग्राम महसूल अधिकारी नवनाथ तांदळे आणि प्रविण सानप यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अर्जदार व गैर-अर्जदार यांच्याशी सखोल संवाद साधला. उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाचे उप अधीक्षक शिवनकर तसेच भूकर मापक संजय जायभाये आणि गणेश थिगळे यांच्या उपस्थितीत सर्व संबंधित पक्षांमध्ये आपसी समेट घडवून आणण्यात आला.

या कार्यवाहीदरम्यान उपविभागीय अधिकारी कविता जाधव आणि तहसीलदार चंद्रकांत शेळके हे प्रत्यक्ष उपस्थित होते. रस्ता खुला करताना अर्जदार अजिनाथ रोडे , कल्याण रोडे , गणेश रोडे , हनुमान रोडे , अशोक रोडे , दिपक रोडे , सुनील जगताप तसेच गैर-अर्जदार कचरू वखरे , भास्कर वखरे , भीमराव ढास आणि इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच ग्रामपंचायत तिप्पटवाडीचे सरपंच विष्णु प्रल्हाद जाधव , मुर्शदपूर ग्रामपंचायतीचे सरपंच कुमार कचरू वखरे , माजी सरपंच अनिल जावळे तसेच प्रतिष्ठित नागरिक सुनील जगताप , गणेश जावळे , भास्कर वखरे आदींनी सक्रिय सहभाग घेत शासनास सहकार्य केले.

सुमारे १ ते १.५ किलोमीटर अंतराचा हा पाणंद रस्ता खुला झाल्याने परिसरातील अनेक शेतकऱ्यांचा दीर्घकालीन प्रश्न मार्गी लागला असून , शेतीपूरक वाहतूक अधिक सुलभ होणार आहे. प्रशासन , लोकसहभाग आणि संवेदनशील निर्णयांचा समन्वय - मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना केवळ रस्ते उघडण्यापुरती मर्यादित न राहता , ग्रामीण विकासाला गती देणारी आणि शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करणारी योजना ठरत आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी , तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी आणि ग्रामस्थ यांच्यातील समन्वयातून ही कार्यवाही पार पडत आहे.एकाच दिवशी जिल्हाभरात ५६ पानंद रस्ते खुले होणे हे बीड जिल्ह्यासाठी मैलाचा दगड ठरणार असून , आगामी काळात ग्रामीण भागातील दळणवळण , शेती आणि अर्थव्यवस्था अधिक सक्षम होईल , असा विश्वास प्रशासन आणि शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# व्यंगचित्र म्हणजे वस्तुस्थिती सांगण्याची कला लेखक मधुकर धर्मापुरीकर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२८ जानेवारी**

व्यंगचित्र म्हणजे मोकळी भाषा व्यंगचित्र म्हणजे वस्तू स्थिती सांगण्याची कला आहे. असे प्रतिपादन नांदेड येथील व्यंगचित्रांचे प्रसिद्ध संग्राहक,लेखक मधुकर धर्मापुरीकर यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजीनगर (युवक कल्याण विभाग)व स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने नरहर कुरुंदकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. व्यंगचित्रांचे संग्राहक, लेखक मधुकर धर्मापुरीकर यांनी व्यंगचित्र कलावंताला वेगळा आवाज ऐकू येतो, व्यंगचित्रे केवळ उथळ मनोरंजन करीत नाहीत तर अंतर्मुख व्हायला भाग पाडतात असे मत व्यक्त केले. व्यंगचित्रांची आपली एक भाषा असते ती आशयघन असतात असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी यांनी भुषविले त्यांनी व्यंगचित्रांचे महत्त्व सांगितले. व्यंगचित्रे जीवनातील वास्तविकता दर्शवितात. व्यंगचित्रातून मानवी जीवनातील न्यूनतेवर मार्मिकतेने भाष्य केले जाते असे मत गणपत व्यास गुरुजी यांनी केले. त्यांनी नरहर कुरुंदकर यांच्या विषयी कांही आठवणी सांगितल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र तथा सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ. संपदा कुलकर्णी यांनी केले.नरहर



कुरुंदकर लोकशाही, समाजवादाचे पुरस्कृते होते. मराठी भाषा, संस्कृती विषयी त्यांना अभिमान होता. असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन नाट्यशास्त्र विभागातील डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे उंडणगावकर यांनी केले. या कार्यक्रमाला योगेश्वरी शिक्षण संस्थेचे जेष्ठ सल्लागार तथा विभाग प्रमुख प्रा. माणिकराव लोमटे, जेष्ठ सल्लागार प्रा. एन. के. गोळेगावकर, अनुराग पुस्तकालयाचे अभिजित जोंधळे, जेष्ठ पत्रकार प्रा. नानासाहेब गाठाळ, माणिकराव बावणे, योगेश्वरी सैनिकी स्कूलचे प्राचार्य मेजर एस. पी. कुलकर्णी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. प्रशांत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ रमेश सोनटक्के, जागर लोकशाहीचा या कार्यक्रमाच्या संयोजिका प्रो. डॉ. शैलजा बरुरे, अंतर्गत गुणवत्ता हमी मंडळाचे प्रमुख डॉ. गंगाधर आकलोड, उपप्राचार्य जितेंद्र देशपांडे, कार्यालयीन अधिक्षक श्रीहरी रामदासी, पर्यवेक्षक प्रा. श्रीकांत जवळगावकर, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी यांच्या सक्रीय सहभागामुळे या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

# मोदी कुटुंबियांच्या हळदी-कुंकू कार्यक्रमाने महिलांचा आनंद द्विगुणित

## मकरसंक्रांत हा स्नेहभाव वाढवण्याचा सण-सौ.सुनिता मोदी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२८ जानेवारी**

येथील क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ.सुनिता राजकिशोर मोदी, सौ.सरोज भूषण मोदी आणि सौ.डिंपल संकेत मोदी परिवाराकडून आयोजित हळदी-कुंकू कार्यक्रमातून महिलांचा आनंद द्विगुणित झाला. या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील विविध क्षेत्रात कार्यरत महिला, भगिनींनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी बोलताना मकरसंक्रांतीच्या निमित्ताने हळदी कुंकू व तिळगुळ वाटपाच्या माध्यमातून महिलांमधील नातेसंबंध अधिक दृढ होतात. मकरसंक्रांत हा स्नेहभाव वाढवण्याचा सण आहे असे सौ.सुनिता मोदी म्हणाल्या येथील क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ.सुनिता राजकिशोर मोदी व परिवाराकडून आयोजित मकरसंक्रांत सणाचे औचित्य साधून महिलांसाठी हळदी - कुंकवाचा व तिळगुळ वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमातून भारतीय संस्कृतीचे संवर्धन व जोपासना करण्यात आली. एकिकडे भारतीय संस्कृती



मध्ये सणासुदीला खूप महत्त्व आहे. मोदी परिवाराने मकरसंक्रांत सणाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे या वर्षीही महिलांसाठी हळदी - कुंकवाचा व तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भारतीय संस्कृतीतील लुप्त होत चाललेल्या अशा परंपरा, सण, उत्सव जोपासण्याचे काम हाती घेतलेले आहे. मकरसंक्रांत हा सण सुवासिनी महिला, भगिनी दरवर्षीच मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा करतात. आपल्या सौभाग्याला दीर्घायुष्य लाभावे म्हणून महिला आपसांमध्ये गाठीभेटी घेवून, मैत्रिण, नातेवाईक आणि आप्तेष्ट यांच्या घरी जाऊन आणि आपल्या स्वतःच्या घरी बोलावून एकमेकींना हळदी - कुंकू लावून तिळगुळ आणि भेटवस्तू देवून आपल्या आयुष्याची वाटचाल अशीच गोड रहावी, ही चांगुलपणाची भावना मनात ठेवून मकरसंक्रांत मोठ्या उत्साहात, विविध उपक्रम राबवून साजरी करतात. याच विधायक भूमिकेतून सौ.सुनिता राजकिशोर मोदी, सौ.सरोज भूषण मोदी आणि सौ.डिंपल संकेत मोदी यांनी भारतीय परंपरा व संस्कृती जोपासत हळदी - कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच शनिवार, दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी केले होते. या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील हजारो सुहासिनी महिला, मुली मोठ्या संख्येने सहभागी होऊन, एकत्रित येवून त्यांनी हा कार्यक्रम साजरा केला. यावेळेस मोदी कुटुंबियांकडून आयोजित न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या भव्य प्रांगणात हा स्नेहमिलन सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे नियोजन अतिशय उत्कृष्ट व शिस्तबद्ध करण्यात आले होते. सर्व सुवासिनी महिलांना मोदी कुटुंबातील महिलांच्या हस्ते हळदी-कुंकवाचा मान देण्यात आला. तसेच वाण व तिळगुळ देत तिळगुळ घ्या, गोड-गोड बोला असा स्नेहाचा संदेश देण्यात आला. सौ.सुनिता राजकिशोर मोदी, सौ.सरोज भूषण मोदी आणि सौ.डिंपल संकेत मोदी यांनी उपस्थित महिलांच्या मकरसंक्रांतीच्या शुभेच्छांचा स्वीकार केला. तसेच महिलांच्या एकोप्याचे कौतुक केले. या सणाच्या निमित्ताने महिला सशक्तीकरण, सामाजिक एकोपा व भारतीय संस्कृतीचे सुंदर दर्शन घडले. निमंत्रणाला मान देऊन मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याबद्दल सर्व मोदी परिवाराकडून उपस्थित सर्व महिला भगिनींचे आभार मानण्यात आले.

# सुंदराराव सोळंके महाविद्यालयात घेतली तंबाखू मुक्तीची शपत

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ जानेवारी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय तंबाखू नियत्रण यांच्या संयुक्त विध्यमाने घेण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयच्या सर्व कर्मचार्यांना व विध्यार्थ्यांना तंबाखूमुक्तीची शपत व त्याच्या परिणामाबद्दल जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमाला महाविद्यालचे प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, प्राचार्य डॉ. गी.के. सानप, उपप्राचार्य डॉ. एम.ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रा. पवनकुमार शिंदे, उपप्राचार्य प्रा. प्रकाश गवते, प्रबंधक मा. प्रशांत चव्हाण, प्रवेशक प्रा. अलझेंडे, प्रा. संजय बागुल यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व कर्मचार्यांना व विध्यार्थ्यांना तंबाखूमुक्तीची शपत देण्यात आली व विध्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांना याच्या परिणामाबद्दल सांगावे असे सुचवण्यात आले.

# जन आरोग्य, आयुष्यमान भारत योजनेचा लाभ घ्यावा-अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ जानेवारी**

महाराष्ट्रात आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, जोतीराव फुले एकत्रितपणे राबविण्यात येत असून या अंतर्गत प्रति कुटुंब प्रतिवर्ष पाच लाख रुपयांच्या मर्यादित उपचार मिळणार आहेत. राज्यातील सर्व नागरिकांनी आयुष्यमान कार्ड तयार करून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केले आहे.

पिवळे, केशरी, अंत्योदय, अन्नपूर्णा योजना ,पांढरे रेशन कार्डधारक कुटुंब तसेच सर्व शासकीय व निमशासकीय अधिकारी- कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय या योजनेत समाविष्ट आहेत. विशेष म्हणजे या योजनेसाठी उत्पन्नाची कोणतीही अट नाही. लाभार्थ्याचे आयुष्यमान कार्ड राज्यातील आशा कर्मचारी, आपले सेवा केंद्रातील कर्मचारी यांच्यामार्फत तयार केले जात आहे.

लाभार्थी आयुष्यमान ॲप किंवा https:/ beneficiary.nha.gov in/ या संकेतस्थळावरील बेनिफिशरी पर्याय द्वारे आपले कार्ड तयार करू शकतात. कार्ड तयार निर्मितीसाठी अद्यायावत शिधापत्रिका, आधार क्रमांक आणि आधारची जोडलेला मोबाईल क्रमांक आवश्यक आहे, असे अनिल बोर्डे नमूद केले आहे.

# युवकांनी प्रत्यक्ष कृतीतून समाजविकासात योगदान द्यावे : दत्तात्रय क्षीरसागर

## शिवणी येथे तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजच्या 'रासेयो' शिबिराचे उत्साहात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ जानेवारी**



राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, स्वच्छता आणि राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण होते. युवकांनी समाजाच्या विकासासाठी प्रत्यक्ष कृतीतून योगदान द्यावे, असे प्रतिपादन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, बीडचे प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांनी केले.

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मंगळवार,दि.२७ रोजी मौजे शिवणी येथे 'शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमीन विकासासाठी युवा' या थीमखाली आयोजित सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे होत्या,तर प्रमुख पाहुणे म्हणून समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.दिनेश काकडे, तुलसी आय.टी. कॉलेजचे प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे उपस्थित होते.

यावेळी प्रा.निकाळजे म्हणाले की, युवकांमध्ये देशभावना जागृत होऊन देशभक्तीतून समाजसेवा घडावी, हा राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य उद्देश आहे. महात्मा गांधीजींच्या संकल्पनेतून राष्ट्रीय सेवा योजनेची मुहूर्तमेढ रोवली गेली असून, ही सामाजिक जाणिवेची चळवळ आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव व सामाजिक बांधिलकी निर्माण करणे हे तिचे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले

अध्यक्षीय भाषणात डॉ.बेद्रे यांनी 'खेड्याकडे चला' या गांधीजींच्या विचारांची मांडणी करत ग्रामीण सक्षमीकरणाचे महत्त्व स्पष्ट केले. खेडे हा भारताचा कणा असून, ग्रामीण विकासाशिवाय शहरी प्रगती शक्य नाही. शेतकऱ्यांकडून मिळणाऱ्या कच्च्या मालामुळे देश चालतो. स्वच्छता, पर्यावरण संवर्धन व वृक्षसंवर्धनावर भर देत स्वतःपासून बदल घडवण्याचे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.वृषाली लोखंडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्वेता वंजारे यांनी मानले. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा.सय्यद शहाणा यांचेसह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच शिवणी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ जानेवारी**

कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त सकाळी ०८:०५ वाजता बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले

यावेळी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे संचालक वीरेंद्र सोळंके, माजी सभापती नितिनराव नाईकनवरे, उद्धव नाईकनवरे मनोज जगताप, संजय कचरे, आबाजी भोसले,नंदकिशोर सजगणे, अमोल जाधव, भगवानराव आगे,प्रभाकर होके,जुगलकिशोर नावंदर,कादिर पठाण सचिव हरिभाऊ सवणे, खरेदी विक्री संघाचे संचालक अशोकराव हूबाले,सह.सचिव रवींद्र नाईकनवरे, लेखापाल उद्धव फपाळ, संख्याकी मोतीराम चव्हाण, निरीक्षक सुनिल सवणे,कोषपाल मिनानाथ मुळे,व.लिपिक अमोल आगे, प्रतवारीकार अतुल होके व सर्व कर्मचारी, व्यापारी, शेतकरी, हमाल, मापाडी उपस्थित होते

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ई-गव्हर्नन्स कार्यक्रमात नांदेड परिक्षेत्र कार्यालय राज्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जानेवारी**
मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यात राबविण्यात आलेल्या १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाच्या मुल्यमापनात नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालयाने राज्यातील सर्व परिक्षेत्रात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.
यापूर्वीही मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यात देखील नांदेड परिक्षेत्र कार्यालयाने राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला होता. दि ७ मे, २०२५ रोजी यांनी सर्व शासकीय कार्यालयांमध्ये कार्यालयीन सुधारणा घडवून आणण्यासाठी १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविण्याचे निर्देश दिले होते. तद्नंतर, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२५ रोजी या कार्यक्रमास दिनांक १० जानेवारी , २०२५ रोजी पर्यंत मुदतवाढ दिली होती. सदर कार्यक्रमांतर्गत प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित व्हावे या उद्देशाने विविध स्तरांवर व्यापक सुधारणा अपेक्षिल्या होत्या. यामध्ये संकेतस्थळ सुधारणा, आपले सरकार पोर्टल, ई-ऑफिस प्रणाली, डेटा डॅशबोर्ड, सोशल मीडिया एकत्रीकरण, व्हॉट्सअॅपद्वारे सेवा वितरण तसेच नाविन्यपूर्ण वेब ॲप्लिकेशन या विषयांवर विशेष भर देण्यात आला होता.
त्यानुसार, नांदेड पोलीस परिक्षेत्राचे संकेतस्थळ नव्याने बनविण्यात आले असून ते अधिक सुरक्षित व नागरिकाभिमुख करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, संकेतस्थळावर विविध शासकीय योजना व सेवांचे एकत्रीकरणही करण्यात आले आहे. आपले सरकार पोर्टल अंतर्गत तक्रारींचे वेळेत निवारण, ई-ऑफिस प्रणालीद्वारे कागदविरहित व जलद फाईल निपटारा, तसेच इंटरॅक्टिव्ह डेटा डॅशबोर्डद्वारे अचूक व अद्ययावत माहिती सादरीकरण यामुळे प्रशासकीय निर्णय प्रक्रिया अधिक प्रभावी झाली आहे. त्याचपमाणे, सेवा वितरणासाठी व्हॉट्सअॅपचा वापर करून अंतर्गत समन्वय अधिक बळकट करण्यात आला आहे. याशिवाय परिक्षेत्रातील अर्ज चौकशीच्या कामकाजासाठी 'संवेदना' ही अख आधारित संगणकीय कार्यप्रणाली विकसित करण्यात आली असून त्याचा प्रभावीपणे वापर सुरु करण्यात आला आहे. सदर प्रणालीव्दारे अर्ज चौकशी पुर्ण केलेल्या प्रकरणांच्या अनुषंगाने तक्रारदारास सदर तक्रारीवर मत मांडण्यासाठी फिडबॅक सुविधा देण्यात आली असून पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयात फिडबॅक सेल देखील सुरु करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, नांदेड परिक्षेत्रातातील गुन्हयांच्या तपासावर देखरेख ठेवण्यासाठी ईगल आय- क्राईम इन्वीस्टेगशन मॉनिटरींग ही प्रणालीसुध्दा सुरु करण्यात आली असून उपरोक्त बाबींसोबतच नांदेड परिक्षेत्रातील गैरप्रकार व अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी हेल्पलाइन 'खबर' ची सुरुवात करण्यात आली आहे. ९१ ५० १०० १०० असा सदर हेल्पलाइनचा क्रमांक आहे. सदर हेल्पलाइनवर नागरिकांना त्यांच्या भागातील गैरप्रकार व अवैध व्यवसायांची माहिती सुलभपणे देणे सोईस्कर झाले आहे. सदर हेल्पलाईन क्रमांकावर व्हॉटस ॲप सेवा कार्यान्वित करण्यात आली असून, नागरीकांनी केलेल्या तक्रारींवर पोलीसांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती देखील सदर क्रमांकावरुन त्यांना देण्यात येते. पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने केलेल्या उपरोक्त कामकाजाची भारतीय गुणवत्ता परिषदेने दखल घेतली आहे. १५० दिवसांच्या सदर कार्यक्रमाची मुदत दिनांक १० जानेवारी, २०२६ रोजी पूर्ण झाल्यानंतर परीक्षेत्रीय कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे मूल्यमापन प्रथमतः पोलीस महासंचालक कार्यालयाकडून करण्यात येऊन, त्यातून (४) परिक्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक/उपमहानिरीक्षक कार्यालयांची निवड करण्यात आली होती. यात, नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाची देखील निवड करण्यात आली होती. त्यानंतर परिक्षेत्र कार्यालयांच्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांनी केले होते. दि. २६ जानेवारी, २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी महाराष्ट्र शासनाने यासंबंधीचा निकाल घोषित केला असून, त्यामध्ये राज्यातील सर्व पोलीस परिक्षेत्रांतून प्रथम क्रमांकाचा मान नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालयास प्राप्त झाला आहे. परिक्षेत्र कार्यालयातील पोलीस अधिकारी, अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी यांचेसोबतच सॉफटवेअर इंजिनिअर हर्षानंद शर्मा, संचालक सारंग वाकोडीकर व सॉफटवेअर इंजिनिअर शहेबाज खान यांनी अहोरात्र घेतलेल्या परिश्रमामुळेच हे यश शक्य झाले असून, या यशामध्ये नांदेड परिक्षेत्रातील प्रत्येक अधिकारी व अंमलदारांचा मोलाचा वाटा आहे, असे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

# शासकीय धान्याच्या साठवण व नोंदीबाबत पारदर्शकतेचा मुद्दा ऐरणीवर




**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २८ जानेवारी**
गरिबांसाठी असलेले शासकीय धान्य सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अत्यावश्यक वस्तू म्हणून गणले जाते. त्यामुळे या धान्याची साठवणूक, वजन, नोंदणी व वाहतूक ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय नव्हे, तर नियमानुसार व कायदेशीर चौकटीत बंधनकारक आहे. वसमत तहसील कार्यालयाच्या अखत्यारीतील धान्य गोडाऊनमधील अलीकडील व्यवहारामुळे या नियमांचे पालन झाले आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.
अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासकीय धान्य गोडाऊनमध्ये उतरविल्यानंतर त्याचे प्रत्यक्ष वजन करणे, पोत्यांची संख्या व दर्जा तपासणे आवश्यक असते. त्यानंतर या सर्व प्रक्रियेची नोंद अधिकृत गोडाऊन रजिस्टरमध्ये करणे बंधनकारक आहे. नोंदीत धान्याचा स्रोत, वाहन क्रमांक, वजन, पोत्यांची संख्या, तारीख व संबंधित जबाबदार अधिकाऱ्याची स्वाक्षरी असणे अपेक्षित असते.
नियमांनुसार, ही प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय धान्याची पुढील वाहतूक करता येत नाही. गोडाऊन अस्तित्वात असताना धान्य थेट 'वाहन ते वाहन' पद्धतीने हलविणे हे केवळ अपवादात्मक परिस्थितीत, तेही सक्षम अधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीनेच करता येते. अन्यथा अशी प्रक्रिया नियमबाह्य ठरू शकते.
कायदेशीर तरतुदीनुसार शासकीय धान्याच्या हाताळणीत वजन तपासणी, नोंदणी किंवा अधिकृत प्रक्रियेविना करण्यात आलेली वाहतूक ही गंभीर बाब मानली जाते. अशा परिस्थितीत संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित होऊ शकते. त्यामुळे गोडाऊन असतानाही साठवण टाळून थेट वाहतूक का करण्यात आली, याचे स्पष्ट कारण समोर येणे आवश्यक ठरते.
हे धान्य थेट गरिबांच्या अन्नसुरक्षेशी निगडित असल्याने नियमांपासून कोणतीही तडजोड मान्य केली जाऊ शकत नाही. त्यामुळे वसमत गोडाऊनमधील व्यवहारात वजन, नोंदणी व वाहतूक प्रक्रिया नियमानुसार पार पडली आहे का? याची सखोल तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

# शासकीय कार्यालयावरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवले



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जानेवारी-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यामुळे शासनाने एक दिवसाची सुट्टी तसेच तीन दिवस शासकीय दुखवटा जाहीर केला आहे. या अनुषंगाने हिंगोलीतील जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय शासकीय इमारतीवरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवण्यात आले आहेत.
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या नेत्यांसह महायुतीतील नेत्यांनी अत्यंत हळहळ व्यक्त केली असून अजित पवार यांच्या निधनामुळे राजकारणातील उमदे, स्पष्ट बोलणारे आणि शब्दाला जागणारे व्यक्तीमत्त्व हरवले असून महाराष्ट्रासह देशाने चांगला नेता गमावला असल्याची प्रतिक्रीया दिली आहे.



**हिंगोली- राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्यावतीने कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात यावी यासाठी येथील गांधी चौकात निदर्शने करण्यात आली. यावेळी राज्य, विभागीय पदाधिकाऱ्यांसह जिल्हाध्यक्ष राजेंद्र हलवाई, संदीप पाचमासे, हरिश किर्तीवार, काशिनाथ कदम, सुभाष अपूर्वा आदी. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतनमध्ये झेंडावंदन



हिंगोली- येथील ॲड. ग्यानबारावजी शिरसाट संस्थेअंतर्गत असणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन विद्यालयामध्ये २६ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.सर्व विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना केली व राष्ट्रगीत सादर झाले. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. व शाळेमध्ये कवायत सादर झाली. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते यावर समूह नृत्य सादर केली त्यामुळे वातावरणात देशभक्तीची भावना अधिक दृढ झाली. यानंतर बक्षीस वितरण सोहळा पार पडला. विविध शालेय स्पर्धा मध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी उपस्थित शाळेचे संस्थाचालक, मेटकर, तसेच शाळेचे संस्था सचिव शिरसाट, अध्यक्ष म्हणून लाभलेले प्राचार्य शेळके, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले पंडित अवचार, शाळेचे मुख्याध्यापक बल्लाळ व पर्यवेक्षक कान्हेड, पर्यवेक्षक डोल्हारे, तसेच महाविद्यालयातील व विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद हे कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचा शेवट हा राज्य गीताने झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इम्रान व नरवाडे ताईंनी पुढाकार घेतला.

### प्रजासत्ताक दिनी तंबाखूमुक्तीची प्रतिज्ञा

हिंगोली- वसमत तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या प्रांगणात, भारतीय ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दि. २६ सोमवारी विद्यार्थी-विद्यार्थीनींना सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांच्या हस्ते तंबाखूमुक्तीचा संकल्प देण्यात आला. प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांच्या हस्ते तंबाखूमुक्तीची शपथ देण्यात आली. मुख्याध्यापक के. पि. पांचाळ, एन. आर. गुजराथी, जे. डी. पाटिल, ए. पि. टोणपे, एम. एस. सुर्यवंशी, ए. आर. स्वामी, एस. डी. वसमते, एम. बी. रेवणवार शिक्षक शिक्षिकांची उपस्थिती होती. नशामुक्त भारत अभियान अंतर्गत, नशामुक्त भारत अभियान समिती, गटशिक्षणाधिकारी कार्यालय, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने, तंबाखू-तंबाखूजन्य दुष्परिणामाबाबत फलक प्रदर्शनाद्वारे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बोराळा गावात जनजागृती फेरी काढली. तंबाखूमुक्तीचा संदेश देण्यात आला. व्यसनमुक्ती प्रबोधनपर जनजागृन पार पडले.

# भावजयीचा खून करणाऱ्या दिरास जन्मठेपेची शिक्षा ठोठावली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जानेवारी**
तालुक्यातील जोडतळा येथे घरातील लहान मुलांच्या भांडणाच्या कारणावरून भावजयीचा खून केल्याच्या आरोपावरून दिरास जन्मठेप व ५० हजार रूपये दंडाच्या शिक्षेचा निर्णय जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायधीश एस एन माने गाडेकर यांनी मंगळवारी दि २७ जानेवारीला दिला आहे.
याबाबत जिल्हा सहाय्यक सरकारी वकील एस एन मुटकुळे यांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली तालुक्यातील जोडतळा येथील सविता जाधव या दि २२ जुलै २०२० रोजी शेतात जेवण करीत बसल्या होत्या. यावेळी त्यांचा दीर रामेश्वर जाधव हा शेतामध्ये आला त्यांनी मागचा पुढचा विचार न करता सविता यांच्या डोक्यात कुऱ्हाडीचे वार केले. या हल्ल्यात सविता यांचा जागीलच मृत्यू झाला. याप्रकरणी रामकिशन काळबांडे यांनी बासंबा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. यावरून पोलिसांनी रामेश्वर जाधव यांच्याविरूध्द खूनाचा गुन्हा दाखल केला. बासंबा पोलिस ठाण्याचे तत्कालीन सपोनि राजेश मलपिल्लू यांच्या पथकाने अधिक तपास करून हिंगोलीच्या जिल्हा व सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.
सदर प्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायधीश एस एन माने गाडेकर यांच्या न्यायालयात सुनावणीसाठी आले होते. या प्रकरणात एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकून न्यायालयाने रामेश्वर जाधव यास दोषी ठरवत जन्मठेप तसेच ५० हजार रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंडाची पूर्ण रक्कम मयत सविताचे तिन्ही मुलांना देण्यात यावी असा आदेश न्यायालयाने दिला. याप्रकरणात सरकार पक्षातर्फे वकील एन एस मुटकुळे यांनी काम पाहीले. त्यांना सहायक वकील सविता एस देशमुख, ॲड एस डी कुटे यांनी सहकार्य केले. सदर प्रकरणी कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोलिस उपनिरीक्षक ए डी डोईजड यांनी काम पाहीले.

# पोलिसांनी वाखारी शिवारात गांजा केला जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जानेवारी**
पूर्णा ते वसमत मार्गावर वाखारी शिवारात कालव्याच्या मार्गाने दुचाकीवर गांजा आणणाऱ्या दोन तरूणांना स्थानिक गुन्हे शाखा व वसमत ग्रामीण पोलिसांच्या पथकाने ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ३ किलो ९०० ग्रॅम गांजासह एक लाख ७८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार पूर्णा येथून एक तरूण त्याच्या दुचाकीवर गांजा घेवून वसमतकडे येणार असल्याची माहीती पोलिसांना मिळाली होती. सदर तरूण मुख्य रस्त्याने न येता कालव्याच्या मार्गावरून येत असल्याचीही माहीती पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलिस अधीक्षक निलभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे, वसमत ग्रामीणचे सपोनि गजानन बोराटे, जमादार गजानन पोकळे, विजय उपरे, साईनाथ कंठे, हरिभाऊ गुंजकर, आकाश टापरे, भुजंग कोकरे, नरेंद्र साळवे, ज्ञानेश्वर गोरे, शिवाजी चालमिरे यांच्या पथकाने पुर्णा ते वसमत मार्गावरील कालव्यावर ठिकठिकाणी दुचाकी वाहनांची तपासणी सुरू केली. दरम्यान संध्याकाळच्या सुमारास पोलिसांनी एक दुचाकी थांबवली. दुचाकीवरील दोघांकडे असलेल्या साहित्याची तपासणी केली असता त्यात गांजा आढळून आला. सदंर गांजाचे वजन ३ किलो ९०० ग्रॅम असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी गजानन पोकळे यांच्या तक्रारीवरून दुचाकी चालक आनंद गायकवाड, योगेश सुर्यवंशी यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हिंगोलीत सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीची आढावा बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जानेवारी**
शासकीय विश्रामगृह येथे दि २७ जानेवारी रोजी दुपारी दोन वाजता पुतळा समितीचे अध्यक्ष तथा माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली आज आढावा बैठक घेण्यात आली यावेळी सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या नूतन अध्यक्षा श्रीमती सुनीताताई मुळे, सचिव सौ रजनी पाटील, उपाध्यक्ष विद्याताई पवार, कल्याणराव देशमुख, खंडेराव सरनाईक, अमोल जाधव, उल्हास पाटील, प्रकाश इंगोले, आदींची उपस्थिती होती. यावेळी शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून यामध्ये उपाध्यक्ष पदी. साधनाताई हेंबाडे अरुणाताई अंभोरे, रेश्मा चव्हाण, अर्चनाताई जाधव, मंदाकिनी चव्हाण, उषाताई इंगोले, शेख गजेला ताई, अनिताताई सुर्यतळ यांना उपाध्यक्षपदी नेमण्यात आले. तर कार्याध्यक्षपदी स्वाती भोयर, कोषाध्यक्षपदी, कांताबाई कल्याणकर, सहसचिव पदी सीमा वाडकर, अलका लोखंडे यांची निवड करण्यात आली. संघटकपदी विना खंदारे, मीरा सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली. तर तर सदस्य पदी वर्षा सरनाईक, नीता सावके, छाया मगर, जया पवार, सुनिता दळवी, शिल्पा भालेराव, दिव्या जोजार, सुजाता भाकरे, डॉ. वसुंधरा सवनेकर, डॉ. स्वाती पवार, डॉ.माधुरी देशमुख, वर्षा ढोकर पाटील, जयश्री मगर वृषाली पाटील, सुनिता कव्हर, अनिता सूर्यतळ, पूजा खंडेल, माया गवळी, वंदना आखरे, साधना घ्यार, सीमा तारे, शकुंतला सावंत, राणी पाटील, स्नेहा घुटे, योगिता देशमुख, अर्चना चाटोरीकर, रेखा पडोळे, तेजस्विनी टाकळगव्हाणकर, उर्मिला राखुंडे, नंदा इंगोले, मीरा कापसे, लक्ष्मी जगताप, नंदा सवडकर, मालती कोरडे, सरस्वती कोरडे, कल्पना मईंग, अरुणा टाकळगव्हाणकर, अर्चना गायकवाड, सुषमा कवठेकर, जयश्री मेटकर, वंदना नायक, रेखा जहिराव, सीमा मगर, राधीका वरूडकर, गायत्री मूळे आदींची सदस्य पदी निवड करण्यात आली. या बैठकीमध्ये शिवजयंती महोत्सव निमित्त विविध समित्या स्थापन करण्यात आल्या असून. त्या अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

# निधी चौधरी यांनी घेतले नागनाथाचे दर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ जानेवारी**
देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी आठव्या स्थानावर असलेल्या ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभूचे महाराष्ट्र राज्याच्या नीती आयोग सचिव श्रीमती नीती चौधरी यांनी दर्शन घेऊन महापूजा केली. तसेच हेमाडपंथी दगडी शिल्पाची व मंदिराची माहिती जाणून घेतली. त्यानंतर देवस्थानच्यावतीने नागनाथ मंदिराची प्रतिमा देऊन सचिव निधी चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, औंढा तहसीलदार हरीश गाडे, देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, देवस्थानचे व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, बबन सोनुने, कृष्णा पाटील, नितीन गोबाडे, मुकेश पडोळे, नामदेव पाटील, देवा देशमुख, रामप्रसाद उदगिरे, गणेश उदगीरे आदींची उपस्थिती होती.



छायाचित्र: महेश होकर्णे

नांदेड 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेगबहादुर यांच्या शहीदी समागमाच्या निमित्ताने दोन दिवसापुर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार नांदेड दौऱ्यावर होते. हा त्यांचा शेवटचा दौरा ठरला.

**महाराष्ट्रातील जनतेचे नुकसान : खा. अशोक चव्हाण**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्याचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्टातील राजकारणात कधीही न भरुन निघणारी पोकळी निर्माण झाली असुन त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली.

**महाराष्ट्राचे मोठे नुकसानः खा. अजित गोपछडे**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्याचे मोठे नुकसान झाले आहे. कालच आम्ही नांदेड येथे श्री गुरु तेगबहादुर यांच्या शहीदी समागमनिमित्त आम्ही सोबत जेवण केले होते, लंगर सेवा केली होती आणि आज ते आपल्यात नाहीत. हे महाराष्टाचे खुप मोठे नुकसान आहे. त्यांच्या कार्यशैलीमुळे आम्ही नेहमीच प्रभावित होतो.

**अजित पवारांशी जिव्हाळ्याचे नातेः खा. आष्टीकर**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाची अत्यंत दुःखद बातमी समजताच मन अतिशय व्यथित झाले.

पवार कुटुंबीय व आष्टीकर कुटुंबीय यांचे संबंध फार पूर्वीपासून जिव्हाळ्याचे व आपुलकीचे राहिले आहेत. ही नाळ केवळ राजकीय नव्हे, तर भावनिक आणि कौटुंबिक स्वरूपाची होती. लोकप्रतिनिधी म्हणून जेव्हा जेव्हा मंत्रालयात अजित पवार यांना भेटण्याचा प्रसंग यायचा, तेव्हा ते आवर्जून माझे वडील स्व. बापूराव पाटील आष्टीकर यांचा उल्लेख करून जुन्या आठवणींना उजाळा द्यायचे. त्यांचा तो आपुलकीचा व मायेचा स्पर्श आजही मनात कोरलेला आहे. ईश्वरचरणी प्रार्थना आहे की दिवंगत आत्म्यास सद्गती लाभो आणि पवार कुटुंबीयांना तसेच त्यांच्या असंख्य चाहत्यांना हे अपार दुःख सहन करण्याची शक्ती परमेश्वर प्रदान करो.

**महाराष्ट्रासाठी दुःखद दिवस : खा. रविंद्र चव्हाण**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक व प्रशासकीय जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. शब्दाला जागणारे, ठाम निर्णय घेणारे, विकासाभिमुख दृष्टीकोन असलेले आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सदैव आग्रही राहिलेले नेतृत्व आपण गमावले असून महाराष्ट्रासाठी आज अंत्यत दुखः चा दिवस आहे. त्यांच्या कार्यकाळात घेतलेले निर्णय, विकासासाठीची भूमिका आणि जनतेशी असलेली थेट नाळ महाराष्ट्राच्या इतिहासात कायम स्मरणात राहील. या दुर्दैवी घटनेत विमान अपघातात प्राण गमावलेल्या सर्व व्यक्तींना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

**आधार वड कोसळला : आ. चिखलीकर**

दादा गेले,हे कळताच धक्का बसला. या घटनेवर विश्वास बसला नाही. टी.व्ही. पाहिला आकाशच कोसळले. विलासराव देशमुख गेल्यानंतर राजकीयदृष्ट्या पोरका झालेल्या माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला आश्रय देणारा पहिला नेता अजितदादा होते. त्यानंतर दुसऱ्यांदा राजकीय अडचणीच्या काळात विधानसभेची उमेदवारी देवून राष्ट्रवादीचा आमदार केले. कडक शिस्तीच्या दादांच मन मेनापेक्षा मऊ असल्याचा अनुभव घेतला आहे. दादा अचानक गेले, माझ्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा आधारवड कोसळला. पवार कुटुंबावर कोसळलेले दुःखाचे डोंगर सहन करण्याची शक्ती परमेश्वराने द्यावे. दादांच्या आत्म्यास शांती देवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

**सर्वसामान्यांना न्याय देणारा नेता : आ. बालाजीराव कल्याणकर**

राज्याचे उपमुख्यमंत्री सर्वाधिक काळ म्हणून ज्यांनी महाराष्ट्राच्या विकासाची चिंता केली. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात भरीव असे योगदान दिले. सर्वसामान्य कार्यकत्यांना सत्तेत र सहभागी करून घेत न्याय दिला. शेतकरी, कष्टकऱ्यांच्या विकासासाठी विधानसभेत आवाज उठवला. अनेक तरतुदी केल्या. लोककल्याणाच्या असंख्य योजना राववल्या. त्या लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे आज अपघाती झालेले निधन धक्कादायक विकासाची दुरदृष्टी असलेल्या नेत्याला गमावलो. उपमुख्यमंत्री अजित पवार खा. यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाल्याचे समजले. ही वातमी मनाला अतिशय चटका लावून जाणारी व वेदना देणारी आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणात फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय, डेंशिग, स्पष्टवक्ता व विकासाची दुरदृष्टी असलेल्या नेत्याला गमावल्याचे माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले.

**राजकारणाचे अपरिमित नुकसान : सुर्यकांता पाटील**

उपमुख्यमंत्री अजित पवार सारखा नेता अशा पद्धतीने जाईल, सकाळी ०८:५० तांत्रिक बिघाडामुळे लैंडिंगच्यावेळी नियंत्रण गमावल् 'गोजुबावी' परिसरातील शेता विमान कोसळले असं कधीच वाटलं नाही. माझ्यापेक्षा १५ ते १६ वर्षांनी लहान होता.लहानाचा मोठा होताना आम्ही पाहिला असल्यामुळे माज्या फार अपेक्षा होत्या त्याच्याकडून. निर्भीड विचाराचा भाड भीड न ठेवता काम करणारा माणूस अंतुले नंतर अजितच वघितला. पवार यांचे जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणाचे अपरिमित नुकसान झाले आहे.

**वेदनादाई बातमी : आ. श्रीजया चव्हाण**

महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाचे वृत्त अविश्वसनीय व वेदनादायी आहे. तीनच दिवसांपूर्वी नदिडला त्यांची भेट झाली, संवाद झाला आणि आज अचानक ते आपल्यात नसल्याची बातमी ऐकून तीव्र धक्का वसला. अजितदादा पवार हे जमिनीशी नाळ जुळलेले नेते होते. त्यांना संपूर्ण महाराष्ट्राच्या प्रश्नांची सखोल जाण होती, प्रश्न मार्गी लावण्याची क्षमता होती, प्रशासनावर प्रभुत्व होते. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राचे अतोनात नुकसान झाले आहे अशी श्रद्धांजली आ. श्रीजया चव्हाण यांनी अर्पण केली.

**कधीही भरुन न निघणारे नुकसान : आ. हेमंत पाटील**

अजित दादांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्राचे कधीही न भरून निघणारे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनावर वचक ठेवणारे, तसेच विधिमंडळातील विविध योजना व कायद्यांचा सखोल अभ्यास असलेले ते एक अभ्यासू, कर्तृत्ववान आणि निर्णयक्षम नेतृत्व होते. विधिमंडळातील ते एक फर्डे वक्ते होते. कृषी, शेतकऱ्यांच्या समस्या, सहकार,सिंचन व अर्थकारण या विषयांची त्यांना सखोल जाण होती. गावपातळीपासून ते मोठ्या शहरांमध्ये भेडसावणाऱ्या समस्यांचे अचूक आकलन असणारे नेते होते. वैयक्तिक पातळीवर सांगायचे झाल्यास, मी २०१४ साली आमदार झाल्यापासून दरवर्षी माझ्या वाढदिवशी आवर्जून फोन करून शुभेच्छा देण्याची त्यांची सवय आज मनाला चटका लावून जाते. राजकारणात आम्ही जरी वेगवेगळ्या पक्षांत कार्यरत असलो, तरी त्यांचे आणि माझे संबंध नेहमीच सलोख्याचे व सौहार्दपूर्ण राहिले. त्यांच्या जाण्याने राज्याने एक अनुभवी, दूरदृष्टी असलेला आणि लोकाभिमुख नेता गमावला आहे.

**कधी न भरून निघणारी पोकळी निर्माणः आ. भिमराव केराम**

किनवट राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा त्यांचे बारामती मतदारसंघाकडे जात असताना विमान अपघातामध्ये दुर्दैवी त्यांचे दुखद निधन झालेला हे खरं म्हणजे उपेक्षित शोषित सर्वसामान्यांचे एक जाणते अशा पद्धतीचे लोकनेते होते त्यांच्या जाण्याने महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक राजकीय क्षेत्रामध्ये प्रचंड नुकसान तर त्या ठिकाणी झालेले कधी न भरून निघणारी पोकळी या ठिकाणी निर्माण झालेली आहे दादांच्या जाण्याने आमच्यासारख्या असंख्य यांचा आशीर्वाद आमच्या पाठीशी एक कार्यकर्ता म्हणून सातत्याने राहायचा हा मायेचा हातच त्या ठिकाणी राहून घेतल्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि म्हणून आज संपूर्ण महाराष्ट्र दादाच्या जाण्याने दुःखामध्ये उठल्या गेलेला आहे यातून बाहेर निघणं हे अतिशय अशक्य अशा पद्धतीची गोष्ट आहे

# सिडकोत अजित दादा पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २८ जानेवारी-**

सिडकोत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजितदादा पवार गटा) चे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अपघाती निधनाचे वृत्त समजताच हाडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सिडको हडको परिसरातील नव्याने निवडून आलेले भाजपाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे यांना अजित दादा पवार यांच्या दुःखद घटनेचे वृत्त समजताच शोकसभा घेऊन दिवंगत अजित दादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी नूतन नगरसेवक संजय पाटील घोगरे, सतीश बसवदे, राजू लांडगे, वैजनाथ देशमुख, विनय गिरडे तसेच जीवन पाटील घोगरे यांच्यासह सिडको



हडको परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. गेली तीस वर्षापासून अजितदादा यांच्या संपर्कात असलेले व त्यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे जीवन पाटील घोगरे यांना यावेळी आश्रु आनावर झाले.

# पंचशील विद्यालयात अजित दादा पवार यांना श्रद्धांजली



**तभा वृतसेवा**
**हगगाव, दि. २८ जानेवारी-**

शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अपघाती निधनाचे वृत्त समजल्यावर त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

संस्थेचे सचिव तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चे सदस्य सुनील हरिहरराव सोनुले यांनी या दुःखद घटनेचे वृत्त समजताच शोकसभा घेऊन दिवंगत अजित दादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना संस्था आणि शाळा प्रशासना तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

अजितदादा पवारांच्या निधनाचे वृत्त दुःखद असून मनाला वेदना देणारे आहे असे सुनिल सोनुले यांनी आपल्या शोक संदेशात म्हटले आहे.

पर्यवेक्षक अनिल दस्तूरकर यांनी शोकसभेच्या सूत्रसंचालनातून अजितदादा पवार यांच्या कार्याला उजाळा देत त्यांना संस्था आणि शाळा प्रशासनाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

या प्रसंगी पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयाचे मुख्याध्यापक,सर्व प्राध्यापक,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जवळा देशमुख येथे अजितदादांना श्रद्धांजली

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ जानेवारी-**

विमान अपघातात निधन झाल्याचे कळताच जवळा देशमुख येथील चिमुकल्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी मुख्याध्यापक ढवळे जी. एस., विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश गोडबोले, आनंद गोडबोले, गुणवंत गच्चे, भीमराव गोडबोले, फारुख पठाण, राजेश शिखरे, मनिषा गच्चे यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्यानंतर राज्य सरकारने सर्व शासकीय कार्यालयांना सुट्टी व तीन दिवसांचा दुखवटा पाळण्याचा आदेश जारी केला. जवळा देशमुख येथील प्राथमिक शाळेत शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर शाळेस सुट्टी जाहीर करण्यात आली. अजित पवार यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्यालाभार्थ्यांची फेर पडताळणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ जानेवारी-**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या लाभार्थ्यांकडून इकेवायसी (श-घधउ) प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थी महिलांकडून पर्याय निवडताना व इतर कारणांमुळे चुकीचा पर्याय निवडला गेल्याने लाभ बंद झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या त्रुटी दुरुस्ती करण्यासाठी लाभार्थी महिलाकडून विनंती करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने योजनेच्या निकषानुसार लाभार्थी पात्र, अपात्र आहेत, याची फेरपडताळणी अंगणवाडी सेविकामार्फत करण्याचे शासनाने २० जानेवारी २०२६ च्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत. सदर योजनेंतर्गत वय, लिंग व कुटुंबातील सदस्याच्या नोकरी/सेवानिवृत्ती संदर्भातील विहित निकषानुसार अंगणवाडी सेविकांमार्फत पडताळणी केली जाणार आहे.

# बिलोलीत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना श्रद्धांजली

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २८ जानेवारी-**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री लोकनेते अजित दादा पवार यांचे विमानाच्या अपघातात निधन झाले. बुधवारी सकाळी बारामती विमानतळाजवळ त्यांचे विमान ऋॅश कोसळले आणि या अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. अजित पवारांच्या निधनामुळे महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. बिलोली येथे व्यापार पेठ बंद करण्यात आले होते.



तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने कै. अजित दादा पवार यांच्या सह सहकार्याना श्रध्दांजली अर्पण करण्यात आले यावेळी राष्ट्रवादीचे सुनिल एमबडवाड, आनंद बिरादार, भिमराव खांडेकर, शेख वाजिद, मुकुंद गादगे, इंद्रजित तुडमे, अमजत चाऊस ,दिलीप उत्तरवाड,सय्यद रियाज, प्रा शंकर पवार,मिलींद मांजरमकर, शेख पाशा भाई, प्रशांत अंकुशकर, संतोष अंकुशकर, राजकुमार गादगे, फेरोज खान प्रविण सोनकांबळे, संग्राम जेठे, अनिल अंबेराय,इरफान शेख, शिलरत्न जाधव,सुमित देवके, भिम देवकरे, रोशन तुडमे, रिजवान शेख, विजय जोगदंड, विरु देवकरे सह अनेक जन उपस्थित होते.

**शब्दाला जागणारा नेता गमावला : हंबर्डे**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाने राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आ हे. शब्दाला जागणारे, स्पष्टवक्ते, ठाम व वेळप्रसंगी कठोर निर्णय घेणारे, जनतेच्या सुख दुःखासाठी नेहमी खंबीरपणे त्यांच्या अडचणी सोडविणारा व विकासाभिमुख दृष्टीकोन असलेला नेता मी जवळून पाहिला. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणारे नेतृत्व आपण गमावले आहे.

**खऱ्या अर्थाने लाडका भाऊ व दादा हरवलाः हणमंत बेटमोगरेकर**

उपमुख्यमंत्री अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील दादा व्यक्तीमत्व होते. राज्याच्या प्रगती मध्ये त्यांचे प्रचंड मोठे योगदान राहिलेले आहे. प्रभावी राजकारणी आणि प्रशासनावर उत्तम पकड असलेलेला नेता म्हणून अजित पवार यांची ओळख होती. जनसेवेसाठी भल्या पहाटे कामाच्या ठिकाणी उपस्थित राहणे ही त्यांची राजकीय खासीयत राहिलेली आहे. त्यांच्या जाण्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात व राज्याच्या राजकारणात मोठी पोकळ निर्माण झाली आहे. त्यांच्या जाण्याचे दुख सहन करण्यापलीकडचे असून आज खऱ्या अर्थाने तमाम लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ व कार्यकर्त्यांचा लाडका दादा आपल्या मधून कायमचा दुर गेलाय. ही वस्तुस्थिती आहे. पवार परिवार व राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराला या दुखातून सावरण्याची शक्ती मिळू हीच इश्वर चरणी प्रार्थना.

**कार्यकर्त्याला न्याय देणारा आधारवड कोसळला : वैशालीताई चव्हाण**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री , अजितदादा पवार यांचा विमान दुर्घटनेत मृत्यू ! ही घटनाच विश्वास न बसणारी ठरली आहे. अजित दादा म्हणजे प्रशासनावर जबरदस्त पकड असणारा नेता , महाराष्ट्रातील कर्तृत्ववान, खंबीर नेतृत्वहोते.दादा जेवढे कठोर तेवढेच मायाळू होते. त्यांचे अकाली दुर्दैवी व दुःखद निधन ही अत्यंत वेदनादायक घटना आहे.. राष्ट्रवादी च्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या संकटात उभा राहणारा दादांच्या जाण्याने आमचा आधारवड कोसळला आम्ही पोरके झालो. त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो व कुटुंबीयांना हे अपार दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

# हिमायतनगर स्टेट बँकेवर प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण करण्यास शाखा अधिकाऱ्यांनकडून विसर

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २८ जानेवारी-**

शहरातील भारतीय स्टेट बँकेवर प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण करण्यास येथील शाखा अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून विसर झाल्याची घटना उघडकीस आली आहे या घटनेने शहरातील नागरिकांनी शाखा अधिकारी यांच्याशी संपर्क करून २६ जानेवारी ह्या दिवशी ध्वजारोहण का केला नाही ह्यांची विचारणा केली असता त्यांच्याकडून असे सांगण्यात आले कि बँकेत कर्मचारी नसल्यामुळे ध्वजारोहण करण्यात आला नाही असे उडवा उडवी चे उत्तर दिल्यामुळे शहरातील सुजाण नागरिकांनी भारतीय स्टेट बँकेच्या शाखा अधिकारी व कर्मचाऱ्यां विरोधात शासनाकडे लेखित तक्रार करून कारवाई करण्याची मागणी केली.

हिमायतनगर शहरातील भारतीय स्टेट बँकेत २६ जानेवारी ह्या प्रजासत्ताक दिनि बँकेवर किंव्हा इतरत्र कुठेही ध्वजारोहण करण्यात




आला नसल्याची घटना उघड झाली आहे त्याचबरोबर २६ जानेवारी हा दिवस सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जात असताना शहरातील सर्व शासकीय व निम शासकीय कार्यालयास २६ जानेवारी या दिवशी ध्वजारोहण करणे बंधनकारक असताना शहरातील सर्वात मोठी बँक असलेल्या भारतीय स्टेट बँकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्याकडून ह्याचे उल्लंघन झाल्याचे उघड झाले आहे ह्याच दिवशी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करणे सुद्धा बंधनकारक असताना येथील कर्मचाऱ्यांकडून या गोष्टीचे सुद्धा उलंघन केल्याचे निदर्शनास आले त्यामुळे ध्वज संहिता २००२ च्या नियमांची पायमल्ली येथील भारतीय स्टेट बँकेच्या शाखा अधिकाऱ्यांकडून होत असल्याचे या घटनेवरून उघड झाले आहे भारतीय स्टेट बँकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यासह बँकेची चौकशी करून संबंधितावर भारतीय ध्वज संहितेचा अपमान केल्याप्रकरणी त्यांच्यावर कठोर कारवाई करून गुन्हा दाखल करावा अशी मागणी शहरातील सुजाण नागरिकांन कडून करण्यात आली आहे.

# स्मारकांची शायनिंग आहे पण सन्मान नाही !

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २८ जानेवारी-**

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने देगलूर नगरपरिषदेच्या वतीने नगर परिषदेची इमारत, राष्ट्रपिता महात्मा गांधी स्मारक आणि पोलीस स्टेशनसमोरील स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झालेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या स्मारकांवर रोषणाई करण्यात आली परंतु स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झालेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या स्मारकांवर अक्षरशः कुत्र्याचा संचार होत आहे. या स्मारकावरील एकूण सात पथदिव्यांपैकी तीन बंद पथदिवे तर तीन ठिकाणी पथदिवेच



सैनिकांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या स्मारक, शहिद अब्दुल हमीद स्मारक आणि या स्मारकांवर मोकाट कुत्र्यांचा संचार होत असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. विशेषतः लाखो रुपयांची स्मारके उभारली परंतु या स्मारकांना दरवाजे नसल्याने अक्षरशः

झालेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या स्मारकाला रंगीत लाइटिंग लावून झगमगाट करण्यात आला. बाह्य रोषणाईने स्मारक उजळले असले, तरी प्रत्यक्षात मात्र या स्मारकाची अवस्था अत्यंत दयनीय असल्याचे वास्तव समोर येत आहे.

या स्मारक परिसरात असलेल्या तब्बल सात पथदिव्यांपैकी केवळ एकच पथदिवा सुरू आहे. उर्वरित तीन दिवे बंद अवस्थेत असून, तीन ठिकाणी तर पथदिवेच नाहीत. परिणामी वर्षभर या स्मारकाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे पहावयास मिळते. केवळ एखाद्या राष्ट्रीय दिनापुरतीच रोषणाई करून 'शायनिंग'

असून स्मारकाच्या पवित्रतेला गालबोट लागले आहे. शहीद जवानांच्या स्मृती जपण्याऐवजी त्यांच्या स्मारकाची ही अवस्था अत्यंत वेदनादायक असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपिता महात्मा गांधी चौक, नगरपरिषद इमारत तसेच पोलीस स्टेशनसमोरील स्मारकावर करण्यात आलेली रोषणाई ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. मात्र ही रोषणाई कायमस्वरूपी असणे, पथदिवे दुरुस्त करणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि मोकाट कुत्र्यांवर बंदोबस्त करणे ही तितकीच आवश्यक बाब आहे. फक्त एक दिवसाचा

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माझे दादा मला पोरका करून गेले...

माझे दादा मला पोरका करून गेले... माझे वडील गेल्यानंतर दादांनी मला वडील नसल्याचे कधी जाणवू दिले नाही. माझं आणि दादांचं नातं शब्दात सांगू शकत नाही. संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासाचे स्वप्न उराशी घेऊन झोपणार आणि भल्या पहाटे ती स्वप्नं पूर्ण करण्यासाठी कामाला लागणारा नेता; वेळेचे नियोजन, शिस्त यातून विकासाचा दरारा महाराष्ट्रात उभा करणारे दादा आज महाराष्ट्रासह संपूर्ण देशाला स्तब्ध करून आणि आम्हा सर्वांना दुःखाच्या छायेत सोडून निघून गेले... दादांचे अकाली निधन ही घटनाच मुळात हृदयाला न पटणारी आहे. आमचे राजकीय अस्तित्व दादांच्या जीवावर होते... त्यामुळे अजूनही असं वाटतंय की, आत्ता दादांचा फोन येईल आणि म्हणतील, धनंजय वेळेवर ये बर का... त्यामुळे श्रद्धांजली हा शब्दच फुटत नाहीये... देशाची, राज्याची, पक्षाची, माझ्या बीड जिल्ह्याची आणि माझी कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे, अशी प्रतिक्रिया माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

**– आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री**





# दादांचे जाणे अकल्पनियच!

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे बुधवारी सकाळी त्यांची कर्मभूमी असलेल्या बारामतीमध्ये विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचाराच्या अनुषंगाने त्यांनी मुंबईहून बारामतीच्या दिशेने सकाळी ८ . १० वाजता उड्डाण केले आणि ८ वाजून ४५ मिनिटांनी बारामतीनजीक त्यांच्या विमानाला अचानक अपघात झाला अन् अजितदादांसह सहा जणांचा मृत्यू झाला. राज्याच्या राजकारणातील दादा माणूस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ' दादांचे' जाणे प्रत्येकासाठी अकल्पनियच ठरलेय.

बुधवारचा दिवस राज्याच्या राजकारणात एक काळा दिवस म्हणून उजाडला. राज्याच्या राजकारणातील एक प्रभावी व्यक्तिमत्व, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या खऱ्या अर्थाने कार्यकर्त्यांसाठीच्या असतात. राज्यात भाजपसोबतच्या महायुतीत सत्तेत असले तरी कार्यकर्त्यांच्या भावनांपोटी दादांनी राज्यात अनेक ठिकाणी स्वबळावर या निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला होता. निवडणुकीनंतर पुन्हा त्यांचा आवश्यक त्या ठिकाणी भाजपसोबत महायुतीशी संलग्न होण्याचाही मनसुबा होता. भाजपच्या नेत्यांनाही या बाबींची कल्पना असणारच, नाही असे नाही. आजचे राजकारण अविश्र्वनीय बनले आहे. परिस्थितीनुरूप तात्काळ निर्णय घेण्याची घाई सद्यस्थितीत अनेकजण करताना दिसतात. त्यातूनच पक्षांतर आणि पक्ष प्रवेश ठरताना पाहायला मिळतात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही प्रमुख राजकीय पक्षात असे प्रकार घडल्याचे पाहायला मिळाले.

सध्या भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांची संख्या मोठी असली तरी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही अनेकांचा प्रवेश झाल्याचे पाहायला मिळाले. लातूरचे माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांच्यासह अनेकांनी मनपा निवडणुकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. लातूर मनपा निवडणुकीत शेवटच्या क्षणी भाजप सोबत महायुती न झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसने ही निवडणूक स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेतला होता. या निवडणुकीच्या प्रचारासाठी अजितदादा लातूरच्या दौऱ्यावर आले होते. अजितदादांच्या प्रभावाने लातूर मनपाच्या निवडणुकीत त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने तब्बल ५६ जागा लढवल्या होत्या. लातूरच्या प्रचार सभेत बोलताना त्यांनी लातूरकरांना मनपा राष्ट्रवादीच्या हातात दिल्यास पिंपरी - चिंचवडच्या धर्तीवर लातूरचा सर्वांगीण विकास करण्याचा विश्र्वास दर्शविला होता. माझ्या पत्रकारितेच्या ३३ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत अजितदादांच्या सभांचे वृत्तांकन करण्याची संधी अनेकदा मिळाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील त्यांची धडाडी पाहून भविष्यात त्यांच्या रूपाने राज्याला भविष्यात एक स्वतंत्र विचारसरणीचा आक्रमक नेता पाहायला मिळाला. अजितदादा मुळात आक्रमक प्रवृत्तीचे नेते होते. प्रसंगी खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे संबोधणारे नेते म्हणूनही ते अवघ्या महाराष्ट्राला परिचित होते. त्यांची लातुरातील प्रचार सभा अखेरचीच ठरली. त्या सभेत दादांचे भाषण प्रभावी झाले मात्र लातूरकरांनी त्यांना अपेक्षेप्रमाणे साथ दिली नाही, हा भाग वेगळा. दादांच्या अपघाताची वार्ता कळल्यापासून सामान्य नागरिकांपासून ते राजकारणातील वरिष्ठ नेत्यांपर्यंत प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू तरळल्याचे पाहायला मिळाले. अनेकांनी जणू आपल्या जिवाभावाची व्यक्ती आपल्यातून निघून गेल्यागत तीव्र सहवेदना व्यक्त केल्या. राजकारणाशी सुतरामही संबंध नसलेल्या व्यक्तींकडून अशा भावना व्यक्त होणं यातच दादांच्या मोठेपणाची कल्पना येते.

अजितदादांची राजकीय कारकीर्द ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली घडली. राष्ट्रवादीपासून वेगळी चूल मांडल्यानंतरही त्यांच्या मनात शरदचंद्र पवार यांच्याविषयी नितांत आदर होता, ते त्यांनी वेळोवेळी दाखवून दिले होते. राजकारण आणि परिवार या दोन्ही बाजूंना स्वतंत्र ठेवण्याचे काम या दोन्ही चुलत्या - पुतण्यांनी सातत्याने केल्याचेही अनेकदा पाहायला मिळाले आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस भविष्यात एकत्रित येणार असेही बोलले जात असल्याचे ऐकायला मिळाले. या चर्चांना आता कायमचा विराम मिळाला आहे. आज अचानक अजितदादा आपल्यातून अपघाताने निघून गेले. त्याचा संपूर्ण राज्याला जसा धक्का बसला आहे, तसा तो पवार कुटुंबियांना आणि विशेषत्वाने शरद पवारांनाही बसला आहे, हे वेगळ्या शब्दात सांगण्याची आवश्यकता नाही. स्पष्टवक्तेपणासाठी ख्यातनाम असलेला, प्रशासनावर मजबूत पकड असलेला हा नेता आज आपल्यातून निघून गेला आहे. शेवटी नियतीच्या मनात जे असते, तेच घडत असते. नियती जे ठरवते तेच होत असते, याची अनुभूती या दुर्दैवी घटनेने पुन्हा एकदा आली आहे. या धडाडीच्या नेत्यास शतशः विनम्र अभिवादन.. !! या अपघातात दादांसोबत असणाऱ्या विदीप जाधव, पिंकी माळी, कॅप्टन सुमित कपूर,कॅप्टन शांभवी पाठक यांच्या स्मृतीसही विनम्र अभिवादन ..

**– श्रीधर स्वामी**



## उपमुख्यमंत्री अजित पवार : कणखर नेतृत्वाला भावपूर्ण अभिवादन..

आज सकाळीच धक्कादायक बातमी कानावर आली आणि मन व मेंदू सुन्न झालें. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री सर्वांचे लाडके

अजितदादा सकाळीच बारामती येथे विमान दुर्घटनेत त्यांचे दुःखद निधन झालें. पहाता पहाता सर्व सोशल मीडिया वर दुःखद निधनाच्या पोस्ट दिसू लागल्या.आज पहिल्यांदाच असं आढळून आलें कि महाराष्ट्रातील सर्व लोक मोबाईल स्टेस्टस वर दादाच्या निधनाची पोस्ट दिसू लागली. दादा कामाचे इतके पक्के कि विमान जिथं क्रश झाले त्या ठिकाणी कित्येक लोकांच्या कामाच्या अर्जं असताव्यस्त पडलेले आढळून आले. अपघातस्थळी दादांचा मोबाईल हि कायमचा नॉट रिचेबल असल्याचं आढळून आलें.आज दादाचं वय हि ६६ वर्षे, ६ महिने व ६ दिवस झालेत हा पण एक योगायोग आहे.

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात काही व्यक्तिमत्त्वे केवळ पदामुळे नव्हे, तर त्यांच्या कामामुळे जनमानसात अढळ स्थान निर्माण करतात. अजित पवार हे असेच एक नाव आहे. ठाम भूमिका, निर्भीड निर्णय आणि कामाशी असलेली प्रामाणिक निष्ठा यामुळे अजितदादानी महाराष्ट्राच्या राजकारणात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

बारामतीच्या मातीशी नाळ जोडलेला हा नेता केवळ सत्तेचा प्रतिनिधी न राहता सामान्य माणसाच्या प्रश्नांशी स्वतःला जोडून घेणारा ठरला. सहकार, सिंचन, कृषी, ऊर्जा आणि अर्थकारण या क्षेत्रांत त्यांनी घेतलेले निर्णय आजही राज्याच्या विकासप्रवाहात महत्त्वाचे मानले जातात. विशेषतः जलसंपदा विभागात काम करताना त्यांनी अनेक रखडलेले प्रकल्प मार्गी लावले. पाणी म्हणजे जीवन आहे, ही भावना त्यांनी कृतीतून दाखवली.

अजित पवार यांची कार्यशैली कधी कठोर वाटली, कधी वादग्रस्त ठरली; पण त्यामागे काम पूर्ण करण्याची तळमळ होती, हे अनेक प्रसंगी दिसून आले. बोलण्यापेक्षा काम महत्त्वाचे हा त्यांचा दृष्टिकोन अनेक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरला. सत्ता येते- जाते, राजकीय समीकरणे बदलतात; मात्र प्रशासनावर पकड आणि निर्णयक्षमतेचा ठसा त्यांनी कायम ठेवला.

एक अनुभवी प्रशासक, अभ्यासू अर्थकारणी आणि जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी अनेक कठीण प्रसंगात राज्याला दिशा दिली. त्यांच्या निर्णयांशी प्रत्येक जण सहमत असेलच असे नाही, पण राज्याच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेणारा नेता म्हणून त्यांचा उल्लेख नक्कीच केला जातो.

आज त्यांच्या कार्याकडे मागे वळून पाहताना, महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांनी दिलेले योगदान ठळकपणे जाणवते. राजकारणात टिकून राहणे सोपे नसते; पण अनुभव, जिद्द आणि कामाची ओढ यांच्या बळावर अजित पवार यांनी हा प्रवास घडवून आणला.

महाराष्ट्रातील असा हुशार, मितभाषी हसमुख, हजरजबाबी नेत्याला श्रद्धांजली वहायला मन धजावत नाही. दादांची राजकीय कार्यकिर्द कायमची महाराष्ट्रातील लोकांच्या कायम स्मरणार्थ राहील. पण दादा अशी अचानक एक्सिट घेतील असं वाटलं नव्हतं.

**–मस्के राजाराम.**

**मराठवाडा आवृत्ती प्रमुख, सोलापूर तरुण भारत.**



मी बारा दिवस आगोदर म्हणजे १७ जानेवारी रोजी बारामती येथील कृषी कॉलेज येथे आदरणीय अजित दादा व आमदार रोहित दादा यांच्या सोबत चर्चा करत करत जेवण केले. त्यांच्या सोबत गोविंदबाग व बारामती कृषी विज्ञान केंद्रातील कृषी प्रदर्शनातही सोबत राहीलो. ध्यानीमनी सुद्धा नव्हतं की असं काही होईल. विश्र्वास बसत नाही की आदरणीय अजित दादा आपल्यात नाहीत...

**–संजय शेटे**
**माजी जिल्हाध्यक्ष :**
**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष–शरदचंद्र पवार, लातूर**

निशब्द..!

दादांना भावपूर्ण श्रद्धांजली लिहिताना हात थरथर कापत आहेत...!

आजची सकाळ महाराष्ट्रासाठी मनसुन्न करणारी बातमी घेऊन आली.अजितदादा यांच्या विमानाचा अपघात नाही तर संपूर्ण महाराष्ट्रावर आभाळ कोसळलं.आपला वाटणारा हक्काचा लाडका 'दादा' पोरकं करून कायमस्वरूपी नॉट रिचेबल झाले.दादा वेळेचे पक्के होते.पहाटे कामाला सुरुवात करणारे आज सकाळीच सर्वांना अचानकपणे सोडून गेले.



जे पोटात तेच ओठात हा अजितदादा यांचा रोखठोक बाणा होता.तोच त्यांचा पारदर्शक स्वभाव लोकांच्या मनात घर करून जात राहिला. एखादं काम होणार असेल तर 'हो' आणि नसेल होणार तर तोंडावर 'नाही' म्हणण्याची हिम्मत फक्त दादांमध्ये होती.कार्यकर्त्यांचे हक्काचा आधारस्तंभ अजितदादा होते.अजितदादांनी कधीही आपल्या कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडलं नाही.राजकारणाच्या धावपळीतही सामान्य कार्यकर्त्याच्या हाकेला ओ देणारा आणि संकटात त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा निधडा छातीचा नेता आज आपल्यात नाही त्यांच्या जाण्यानं केवळ राष्ट्रवादी काँग्रेसच नाही,तर संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून जनसामान्यांच्या हक्काचा दादा आपल्यातून गेल्याने महाराष्ट्र 'पोरका' झालायं..

**–डी.उमाकांत**
**प्रसिद्धी प्रमुख, लातूर शहर**
**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार**

## अजित पवारांच्या निधनाचे वृत्त ऐकून अनेकजण धाय मोकलून रडले !

### जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे नेते बारामतीकडे रवाना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ जानेवारी :** उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाचे वृत्त ऐकताच राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री संजय बनसोडे, शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक पदाधिकाऱ्यांना दुःख अनावर झाले. अनेकांच्या भावनांचा बांध सुटला आणि ते अक्षरशः धायमोकलून रडल्याचे चित्र लातुरात पाहायला मिळाले. जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आपल्या आवडत्या लाडक्या नेत्याचे अंत्यदर्शन घेण्यासाठी बारामतीकडे रवाना झाले आहेत.

लातूर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने आपले वर्चस्व वाढवायला सुरुवात केली होती. विद्यमान मंत्रिमंडळात अहमदपूर - चाकूर विधानसभा मतदार संघाचे आ. बाबासाहेब पाटील यांना दादांनी मंत्रिपदाची संधी दिली होती. आजमितीस बाबासाहेब पाटील राज्याचे सहकार मंत्री म्हणून कार्यरत आहेत. दादांच्या आकस्मिक निधानचे वृत्त ऐकल्यानंतर त्यांना तीव्र दुःख झाले. शिक्षक आमदार विक्रम काळे आणि बाबासाहेब पाटील हे दोघेही दुःखातिरेकाने व्याकुळ होऊन एकमेकांच्या गळ्यात पडून ते धाय मोकलून रडत असल्याचे चित्र लातूरकरांनी पाहिले . आपल्या आवडत्या नेत्याचा असा भीषण अपघातात मृत्यू झाला आहे , ही भावनाच मुळी त्यांच्या मनाला पटत नव्हती. माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांचीही अवस्था काही अंशी अशीच झाल्याचे पाहायला मिळाले. या नेत्यांसह राष्ट्रवादीचे अनेक पदाधिकारीही दादांच्या निधनाने हतबल होऊन दुःखमग्न झाल्याचे पाहायला मिळाले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे बाबासाहेब पाटील, आ. विक्रम काळे, आ. संजय बनसोडे, मकरंद सावे, पवन भोसले, प्रशांत पाटील, अफसर शेख यांच्यासह अनेक पदाधिकारी अजित पवारांच्या अंत्यदर्शनासाठी बारामतीकडे रवाना झाले आहेत. राज्यातील बड्या नेत्याचे दुःखद निधन झाल्याचे पडसाद जणू वातावरणातही दिसून येत होते. लातूर शहर आणि परिसरातील वातावरणावरही काहीशी दुःखद छाया पसरल्याचे जाणवत होते. एक प्रकारची उदासी, शोककळाही पाहायला मिळाली.

## धाडसी नेतृत्व हरवले



सर्वसामान्यांची कामे करणारा धाडसी नेता आज महाराष्ट्रातून हरवला आहे. तसेच भेदभाव न करणारे नेतृत्व आज आम्ही गमावले आहे.औसा नगरपरिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्रभागरचनेत बदल करण्याचे निवेदन एमआयएमच्या वतीने देण्यात आले. त्यावेळी झेड सुरक्षा रक्षकामुळे निवेदन घेऊन ताटकळतच होतो. हे लक्षात आल्यानंतर आम्हाला बोलावून, आमचे निवेदन स्विकारुन यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश संबंधितांना जाग्यावरच दिले. यातून दादांच्या कामाची धमक लक्षात येते. यानंतरही चार वेळा भेट झाली. यामध्ये दोन वेळा निवेदन दिले. आणि जाग्यावरच आदेश दिले असल्याची आठवण एमआयएमचे जेष्ठ नेते सय्यद मुझफारअली इनामदार यांनी सांगितले.



महाराष्ट्रातल्या राजकारणातील रोखठोक व्यक्तिमत्व राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झालं त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. राज्याच्या सहकार, कृषि, क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत मंत्रिमंडळात उत्तम प्रशासक म्हणून ओळखले जाणारे अजितदादा पवार यांच्या जाण्याने राज्यातील लोकाभिमुख चेहरा हरवला आहे पवार कुटुंबाच्या दुःखात देशमुख परिवार सहभागी आहे. ओम् शांती

**– दिलीपराव देशमुख, माजी मंत्री**



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे बारामती येथे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाल्याची वार्ता समजताच मन सुन्न झाले. राज्याच्या राजकारणातील एक धडाडीचा, हरहुन्नरी नेता काळाच्या पडद्याआड गेल्याने अतीव दुःख झाले. परखड स्वभावाचे धनी असलेल्या अजित पवारांचा राज्याच्या समस्यांचा चांगला अभ्यास होता. त्यांच्या अकाली जाण्याने राज्याची खूप मोठी हानी झाल्याची प्रतिक्रिया लातूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी व्यक्त केली.


भावपुर्ण श्रद्धांजली..!

**– खा.डॉ. शिवाजी काळगे**



महाराष्ट्र राज्याचे अर्थकुशल उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, मा. श्री अजित दादा पवार यांचा भीषण अपघातात दुःखद निधन झाले. ही घटना काळजाला चटका लावून जाणारी आहे. हा केवळ एक अपघात नाही, तर लाखो कार्यकर्ते, सामान्य नागरिक आणि राज्याच्या राजकारणावर कोसळलेला आघात आहे. ही घटना मन हेलावून टाकणारी असून शब्द अपुरे पडावेत अशी वेदना प्रत्येकाच्या मनात घर करून बसली आहे. राजकारणात स्पष्ट भूमिका, निर्भीड निर्णयक्षमता आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी कायम उभं राहणारं एक हक्काचं नेतृत्व आज आपल्यातून निघून गेलं आहे. मा. अजित दादा पवार यांच्या जाण्याने राजकीय, सामाजिक आणि वैचारिक पातळीवर जी प्रचंड पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक कणखर, प्रामाणिक आणि लढवय्या नेतृत्व गमावलं आहे. ही हानी केवळ एका कुटुंबाची किंवा एका पक्षाची नसून संपूर्ण महाराष्ट्राची आहे. मा. अजित दादा पवार यांची आठवण, त्यांचे विचार आणि त्यांनी दिलेले मार्गदर्शन कायम आमच्या हृदयात जिवंत राहील.

**–आ. विक्रम काळे**



महाराष्ट्राच्या राजकारणाला हादरवणारी घटना आज सकाळी बारामतीत घडली. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांचं विमान अपघातात निधन झालं. विमान लँडिंगवेळी अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक प्रचारासाठी बारामतीत जात असताना त्यांचा दुर्देवी अपघात झाला. त्यांच्या निधनानंतर संपूर्ण राज्य शोकाकूल झाला आहे. नेतेमंडळींसह सिनेसृष्टीतील कलाकारांनाही अश्रू अनावर झाले आहे. अभिनेता रितेश देशमुख याने समाजमाध्यमांवर पोस्ट शेअर करून श्रध्दांजली वाहिली आहे. तसेच दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे अजित पवारांसोबतचे फोटोही शेअर केले आहेत.

**–रितेश देशमुख**